मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

१

शुक्रवार दि. २४ एप्रिल १९९८ रोजी झालेल्या ५२ व्या बैठकीचा

कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ५२ वी बैठक शुक्रवार दि. २४ एप्रिल ९८ रोजी दुपारी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१.	ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण,	सभापती.
२.	श्री एस. एस. संधू,	मुख्य अधिकारी.
३.	,, चंद्रकांत विश्वासराव,	सदस्य.
४.	,, अमोद उसपकर,	,,
५.	,, भालचंद्र ठाकूर,	,,
६.	,, दगडू सकपाळ,	,,
७.	,, देवदास साटम,	,,
८.	ॲडव्होकेट श्री प्रकाश भूवड,	,,
९.	श्री दिलीप गोडांबे,	,,
१०.	,, गणेश तिकोने,	,,
११.	डॉ. विनोद मेहता,	,,
१२.	श्री अभय सावरकर,	,,
१३.	,, अनंत पालकर,	,,
१४.	,, दाजी [गोपाळ] मोडक,	,,
१५.	प्रमुख अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी,	निमंत्रक.
१६.	उपकर निर्धारक व संकलक[शहरे], म. न. पा.	,,

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे व अधिकारीवर्गाचे स्वागत करून माहिती दिली की, उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] या पदावर श्री ए. बी. करांडे यांची बदलीने नियुक्ती करण्यात आली आहे. व त्यांनी श्री परब यांच्याकडून कार्यभार स्विकारला आहे. मा. सभापती यांनी सर्वांच्यावतीने श्री करांडे, उ. मु. अभि. यांचे मन:पूर्वक स्वागत करून सचिव श्री सावंत यांना विषयानुरूप बैठक सुरु करण्याच्या सूचना दिल्या.

सचिव श्री सावंत यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करून बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ५२.१

२

विषय- [अ] मुं. इ. दु. व. पु. मंडळाच्या दिनांक-
२०/३/९८ रोजी झालेल्या सन १९९७-९८
चे सुधारित तसेच सन १९९८-९९ च्या
अर्थसंकल्पीय बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी
करणेबाबत.

विषयांकित कार्यवृत्तांत पृ. क्र. १ ते ७७ वर स्थायी करण्यासाठी सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत सन्मा. सदस्यांनी अशी सूचना केली होती की, अवजारे वगैरे यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पात ३० ते ३५ लाख रुपयांची जी तरतुद केली आहे ती वाढवून रु. ४० लाखापर्यंत करण्यात यावी. त्या सूचनेची नोंद घेण्यात आली असून अर्थसंकल्पात जरी वाढीव तरतुद केलेली नसली तरी, आवश्यकतेप्रमाणे जर रु. ५ ते १० लाख जास्त लागले तर दुसऱ्या हेडमधून ही तरतुद करुन पैसे या कामासाठी मान्यतेने वर्ग करता येतील. वरील माहितीनंतर सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

[ब] विषय- मुं. इ. दु. व. पु. मंडळाच्या दि. २०/३/९८ रोजी संपन्न झालेल्या ५१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणेबाबत.

विषयांकित कार्यवृत्तांत पृ. क्र. ७९ ते १६१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा करताना कार्यकारी अभियंता, स. सं. कक्ष श्री महाजन यांनी निदर्शनास आणले की, पृ. क्र. ८५ वरील "जस्मीन लॉज" या संस्थेच्या १२ लोकांनी त्यांना सदस्यत्व मागे घ्यावयाचे आहे असे लेखी कळविले आहे. यावर मा. सभापती यांनी श्री महाजन यांच्या लक्षात आणून दिले की, सध्या कार्यवृत्तांत स्थायी करण्यात येत असल्यामुळे जेव्हा सदर विषय चर्चेसाठी येईल तेव्हा त्यांनी हा विषय मांडावा. कारण मागील बैठकीमध्ये सदर प्रस्ताव ७० टक्के रहिवाशांची संमती असल्यामुळे मंजूर केला होता व आता काही

रहिवाशी येऊन सांगत असतील की, त्यांच्याकडून जबरदस्तीने सही घेण्यात आलेली आहे तर तो प्रशासनाचा अंतर्गत विषय आहे. त्यामुळे प्रथम तो उ.मु.अभि. [दक्षिण] व मुख्य अधिकारी यांच्यापुढे सादर करून आवश्यक असल्यास सदर प्रस्ताव बैठकीपुढे बाब टिपणीद्वारे सादर करण्यात यावा म्हणजे निर्णय घेणे उचित होईल.

सविस्तर चर्चेअंती व मा.सभापती यांनी सुचविलेल्या सूचनेस आधिन राहून विषयांकित कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : ५२/२. [उपमुख्य अधिकारी [पु.गा.]

[अ] विषय- पुनर्रचित इमारत ९-अ-ब, वाणी चाळ,
जे.बी. भातनकर मार्ग, परळ.
- भाडे आकारणीबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृ.क्र. १६३ ते १६९ वर सादर करण्यात आला आहे.

मा.सभापती यांनी माहिती दिली की, सदर इमारतीच्या रहीवाशांनी लेखी मान्य केले होते की, जरी त्यांना पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचे वितरण मिळाले असले तरी त्यांना त्यांच्या मुलांच्या परिक्षा होईपर्यंत संक्रमण शिबीरात काही काळ राहू दिल्यास ते पुनर्रचित इमारतीतील गाळ्याचे व संक्रमण गाळ्याचे भाडे भरण्यास ते तयार आहेत. त्यांनी पुढेही असे निदर्शनास आणले की, एकदा का पुनर्रचित इमारत मंडळाच्या ताब्यात आली की, त्या दिवसापासून मुंबई महानगरपालिकेचे वेगवेगळे कर सुरु होतात. त्यामुळे मंडळाच्या ताब्यात इमारत आल्यापासूनचे भाडे मंडळ आकारते व तसा नियमही आहे. परंतु इमारतीचा ताबा जानेवारी किंवा डिसेंबर यासारख्या मधल्या काळात जे मंडळाकडे येतो तेव्हा रहिवाशी त्यांना पुनर्रचित गाळ्यांचे वितरण मिळूनही त्यांची मुले संक्रमण शिबीराजवळच्या शाळेत शिकत असल्याने मुलांच्या वार्षिक परिक्षा संपेपर्यंत संक्रमण शिबीरातच रहातात व मुलांची परिक्षा संपली की पुनर्रचित गाळ्याचा ताबा घेतात. त्यांच्या विनंतीनुसार त्यांना संक्रमण शिबीरात रहाण्याची परवानगी दिली जाते. त्याप्रमाणे ९-अ-ब, वाणी चाळीतील लोकांनी

७

विनंती केल्यानुसार त्यांच्याकडून लेखी लिहून घेण्यात आले व संक्रमण शिबीरात रहाण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यांच्याप्रमाणे मा. राज्य मंत्री श्री राज पुरोहीत यांच्यासमोर लेखी मान्य केल्याप्रमाणे प्रत्यक्षात मात्र भाडे भरण्यास नकार दिला.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, वाणी चाळीच्याच संबंधात नाही तर इतरही इमारतींच्याबाबतीत असाच अनुभव आला आहे. एखादी इमारत पुनर्रचित झाल्यानंतर मंडळाचेच अधिकारी लोकांना गाळ्यांचा ताबा देण्यामध्ये अडचणी निर्माण करतात व त्यामुळे लोकांना दोन गाळ्यांचे भाडे मंडळास भरावे लागते.

यावर श्री नाचणकर, स. मु. अ. यांनी माहिती दिली की, वाणी चाळ ही मंडळाच्या ताब्यात दि. २३. १०. ९६ रोजी आली व तेव्हापासून मंडळ म. न. पा. कडे कर भरत आहे. या चाळीच्या रहिवाशांना जुलै-१९९६ पासून देकारपत्रे देण्यात आली होती व गाळ्यांच्या वाटपासाठी चाळ कमिटीने सर्वसंमत ठराव मंडळास सादर करावा अन्यथा सोडतीसाठी त्यांनी पुढे यावे असे कळविण्यात आले परंतु रहिवाशी याबाबत पुढे आले नाहीत. सर्वसाधारणपणे इमारतीचा ताबा जेव्हा मंडळाकडे येतो तेव्हा अशा सर्वच इमारतींचा कर म. न. पा. कडे मंडळ भरते व तेव्हापासून रहिवाशांना भाडे आकारले जाते. वाणी चाळीच्या लोकांचे असे म्हणणे आहे की, सन १९९१ मध्ये प्रोग्रेसिव्ह इमारतीला मंडळाने जसे भाडे आकारले त्याप्रमाणे त्यांनाही भाडे आकारावे. प्रोग्रेसिव्ह इमारत एप्रिल-९१ मध्ये मंडळाच्या ताब्यात आली व लोकांनी कागदपत्रे सादर करुन त्यांच्या नस्तीही तयार होत्या व मे-९१ पासून त्यांना भाडे आकारण्यात आले. वाणी चाळीच्या बाबतीत लोकांकडून विलंब होत आहे. व प्रशासनाकडूनही विलंब होत आहे. या चाळीतील रहिवाशांनी गाळ्यांचे ताबे घेतलेले आहेत व भाड्याचे पैसे भरलेले आहेत. याबाबत एप्रिल-१९९७ मध्ये मा. राज्य मंत्री श्री राज पुरोहित यांच्याकडे बैठक झाली. त्यावेळी त्यांनी असे सुचविले की, प्रोग्रेसिव्ह इमारतीला जो नियम लावला गेला तोच नियम सदर इमारतीस लावावा व त्यानुसार मार्च-१९९७ मध्ये त्यांना गाळ्यांचा ताबा दिला असल्याने तेव्हापासून त्यांना भाडे आकारण्यात यावे. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, सदर इमारतीतील काही लोकांनी निवेदन दिले होते की, मुलांच्या परीक्षा संपेपर्यंत एप्रिल-९७ पर्यंत त्यांना संक्रमण शिबीरात रहाण्यास परवानगी

त्या इमारतीतील एका गटाचे म्हणणे असे आहे की, ते रहावयास जातील तेव्हापासून त्यांना भाडे आकारण्यात यावे. त्यामुळे मधल्या काळाचा जो कर आहे त्याचा विचार कोणी करावा ?

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, इमारत तयार होऊनही रहिवाशी रहावयास जात नाहीत त्यास केवळ तेच जबाबदार नसून मंडळ जास्त जबाबदार आहे. यावर मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, वेगवेगळया प्रकरणांमध्ये वेगवेगळे निर्णय होऊ शकतात. सदर इमारतीचा विषय हा सांकेतिक विषय आहे. सर्वसाधारण नियम या दृष्टीकोनातून आपण विचार करुन चालणार नाही. प्रत्यक्षात येणा-या अडचणी वेगळया आहेत व नियमाची तरतुद वेगळी आहे. शैक्षणिक वर्षाच्या अडचणीपेक्षा दुसरी कोठलीही अडचण या लोकांना नव्हती किंवा इतर वादही नव्हते. तर रहिवाशी/ भाडेकरु यांची मुले शाळेत असल्याने मध्येच त्यांना दुस-या ठिकाणी हलविणे वा दुस-या ठिकाणी शाळेत प्रवेश होणे अशक्यप्राय गोष्ट असते. तरी अशाप्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत या दृष्टीकोनातून वेळापत्रक बनवून गाळयांचे तावे देण्यात यावेत. परंतु जर दुसरे काही वाद असतील तर ते योग्य पध्दतीनेच हाताळण्यात आले पाहिजेत व योग्य तो निर्णय त्या त्या स्तरावर घेतला पाहीजे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, जर रहिवाशांनी मुलांच्या शाळेच्या अडचणींमुळे संक्रमण शिबीरात रहाण्याची परवानगी मागितली असेल व दोन्हीकडचे भाडे भरण्याचे त्यांनी मान्य केले असेल तर काही हरकत नाही. परंतु इमारत बांधून ५-७ वर्षे झाली तरी लोक संक्रमण शिबीरात असतात. काही प्रकरणात गाळयांच्या वाटपासाठी कमिटीचा सर्वसंमत प्रस्ताव आल्याशिवाय किंवा सोडत काढल्याशिवाय मंडळ रहिवाशांना पुनर्रचित गाळयांचे वाटप करत नाही. अशावेळी सर्वकष विचार करुन भाडेकरु नवीन इमारतीत रहाण्यास गेल्याच्या तारखेपासून त्यांना नवीन इमारतीचे भाडे लावले पाहीजे. अन्यथा भाडेकरु/रहिवाशी यांचेवर नाहक अन्याय होईल व लोक दोन्हीकडील भाडे भरण्यास तयार होणार नाहीत.

मा. सदस्य श्री तिकोने यांनी असे मत व्यक्त केले की, साधारणत: मुंबईचा रहिवाशी एप्रिल-मे या महिन्यात घर बदलण्याच्या मन:स्थितीत असतो. हे लक्षात घेऊन महानगरपालिकेने रहिवास दाखला [ऑक्युपेशन सर्टिफिकेट] देण्यासंबंधीची प्रक्रिया एप्रिल-मे च्या दरम्यान पूर्ण करण्याबाबत मंडळ, महानगरपालिका व शासन यांनी मिळून एक धोरणात्मक निर्णय घ्यावा.

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, रहिवाशांनी पुनर्रचित इमारतीत कधी जावे हे मंडळ त्यांना सांगू शकत नाही. तसा मंडळाला अधिकारही नाही. कारण ज्या रहिवाशांना मुलांच्या शिक्षणाच्या अडचणी नसतात ते कधीही पुनर्रचित इमारतीत जाण्यास तयार असतात.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी अशी मागणी केली की, पुनर्रचित इमारत तयार झाल्यानंतर लोकांनी तेथील गाळ्यांचा ताबा घेतल्यानंतरच भाडे आकारण्यात यावे व यादृष्टीने मार्ग काढण्यात यावा.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, तोबावाणी चाळीतील लोकांना ५-६ महिन्यांपूर्वीच गाळ्यांचे वितरण करण्यात आलेले आहे. दोन चाळींच्या रहिवाशांमध्ये वाद निर्माण झाला व त्यांनी मध्ये भिंत घालून घेतली. लोकांना गाळ्यांच्या चाव्या दिलेल्या आहेत. परंतु काही लोक पुनर्रचित इमारतीत जाण्यास तयार नाहीत व संक्रमण गाळेही सोडण्यास तयार नाहीत. जी भिंत बांधण्यात आली आहे त्यासाठी मंडळाची किंवा रा.गां.नि. प्रकल्पाची किंवा महानगरपालिकेची मान्यता घेण्यात आलेली नाही. ती जबरदस्तीने बांधण्यात आलेली आहे. इमारतीत जाण्याचा रस्ता बंद करण्यात आला आहे. तसेच आगबोटवाला चाळ ३ वर्षांपासून तयार आहे परंतु त्या इमारतीतील १६ लोकांना संक्रमण गाळेच हवे आहेत. पुनर्रचित इमारतीत जाण्यास ते तयार नाहीत. शासनाच्या विधी खात्याने मा. मंत्री महोदय यांना सल्ला दिला आहे की, संक्रमण शिबीरात कोणालाही कायमस्वरूपी ठेवता येत नाही. पुनर्रचित इमारत तयार झाल्यानंतर त्या इमारतीत त्यांना जावेच लागते. सदर इमारतीबाबत शासनाला असे सुचविण्यात आले की, ह्या १६ लोकांच्या बाबतीत शासन निर्णय घेईपर्यंत इतर रहिवाशांना सोडत काढून गाळ्यांचे ताबे देण्यात यावेत. गेली ३ वर्षे झाली. शासन ह्या १६ लोकांच्या बाबतीत निर्णय घेत नाहीत व इतर रहिवाशांना गाळ्यांचा ताबा घेण्यासाठी आदेशही देत नाही. त्यामुळे मंडळास काम करणे कठीण झालेले आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती मा. सभापती यांनी असे सुचविले की, प्रस्तावाच्या शेवटच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचे फक्त सेवाशुल्क घेण्यास हरकत नाही किंवा मुख्य अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे [illegible] मा. मंत्री महोदयांनी भाडेकरूंना सवलत देण्याबाबत हाउसमध्ये आश्वासन दिलेले

आहे. त्यामुळे हे आश्वासन पाळणे मंडळावर बंधनकारक आहे.

मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, प्रोग्रेसिव्ह इमारतीच्या बाबतीत जो निकष लावण्यात आला आहे तोच निकष वाणी चाळीच्या रहिवाशांना लागू करण्यात यावा व मा. मंत्री महोदयांनीही तसे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे विशेष बाब म्हणून कार्यवाही करण्यात येईल. मा. सभापती यांनी सुचविल्याप्रमाणे याबाबतीत धोरण ठरविण्यासाठी मंडळासमोर बाब पुन्हा आणण्यात येईल.

याबद्दल मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे सुचविले की, धोरण ठरविताना रहिवाशी संक्रमण शिबीरात असेपर्यंत त्यांच्याकडून फक्त संक्रमण गाळ्याचेच भाडे घेण्यात यावे व पुनर्रचित इमारतीतील गाळ्यात जेव्हा तो जाईल तेव्हापासून त्या गाळ्याचे भाडे आकारण्यात यावे हा मुद्दा समाविष्ट करावा.

चर्चेच्या अनुषंगाने मा. सभापती यांनी असे सुचविले की, जर एखादी इमारत ऑगस्टमध्ये तयार झाली की, नियमाप्रमाणे रहिवाशांना गाळ्याचा ताबा घेण्यास सांगावे व जर काही अडचणींमुळे रहिवाशी नवीन गाळ्यात रहाण्यास गेला नाही तर त्यांच्याकडून दोन्ही ठिकाणचे भाडे आकारण्यात यावे. या मताशी मा. सदस्य श्री सकपाळ यांनी सहमती दर्शविली. मा. सभापती यांनी पुढे अशी माहिती दिली की, प्रोग्रेसिव्ह इमारतीची भाडे आकारणी ही रितसर पध्दतीने केलेली आहे किंवा कसे याबाबत भविष्यात या मुद्दयावर लेखापरिक्षकांची हरकत प्राप्त झाल्यावर अयोग्य भाडे आकारणी सुधारावी लागेल व संबंधित भाडेकरूंकडून थकबाकी वसूल करावी लागेल. म्हणजेच प्रोग्रेसिव्ह इमारतीच्या बाबतीत दिलेले आदेश चुकीचे आहेत. परिणामत: रहिवाशांना थकबाकी भरण्याचे आदेश द्यावे लागतील.

मा. सदस्य श्री गोडांबे यांनी असे मत व्यक्त केले की, वरील प्रकारामुळे भाडेकरूंवर अन्याय होणार आहे. व प्रोग्रेसिव्ह इमारतीप्रमाणे जरी कार्यवाही केली तरीही भाडेकरूंवर अन्याय होणार आहे. म्हणून एखादी इमारत पुनर्रचित झाली की, नवीन गाळ्याचा ताबा किती कमीतकमी कालावधीमध्ये भाडेकरूंना द्यावा याबाबत एक निश्चित धोरण ठरविण्यात यावे.

यावर मा. सभापती यांनी असे निश्चित धोरण ठरविता येत नाही असे सांगून निदर्शनास आणले की, पुनर्रचित इमारत मिळकत व्यवस्थापन विभागाकडे कधी देण्यात येईल याची विचारणा पुनर्रचना

विभागाकडे करण्यात येते. पुनर्रचना विभागाने दिलेल्या ठराविक कालावधीत मिळकत व्यवस्थापन विभागास वितरणासाठी आवश्यक त्या प्रक्रिया सुरु करण्याच्या सूचना दिल्या जातात. महानगरपालिकेने निवासी वापर परवाना दिल्यानंतर गाळ्यांचे वाटप करण्यात येते.

सविस्तर चर्चेअंती मा. सभापती यांनी सदर प्रस्तावाबाबत असे सुचविले की, प्रोगेसिव्ह इमारतीबाबत घेतलेल्या चुकीच्या निर्णयाबाबत मा. मंत्री महोदयांना माहिती देण्यात यावी व वाणी चाळीबाबत भाडेकरु/रहिवाशी यांच्याशी बोलून त्यांच्यावर अन्याय होणार नाही असा मार्ग मुख्य अधिकारी यांनी काढावा. यास सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.

[ब] विषय- परेल येथील भक्ती व अभंग हया पुनर्रचित इमारतींमधील रिक्त गाळे संक्रमण शिबीर म्हणून वापरण्याबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृ. क्र. १७१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, प्रस्तावात असे म्हटले आहे की, शहरामध्ये पुनर्रचित इमारतीतील ९० गाळे संक्रमण गाळे म्हणून उपयोगात आणण्यार. ते गाळे उपकरपात्र इमारतीतील लाभधारकांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही देण्यात येऊ नयेत. असे या प्रस्तावात नमूद करुनच हा प्रस्ताव आणला पाहीजे होता. त्यामुळे या प्रस्तावात रितसर सुधारणा करुन पुढील बैठकीत तो ठेवण्यात यावा, असे त्यांनी सुचविले.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी सूचना केली की, सदर प्रस्तावात आवश्यक सुधारणा करुन घेऊन याच बैठकीत सदर प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. श्री मोरे, उ. मु. अधिकारी [पु. गा.] यांनी मुळ प्रस्तावात तसा उल्लेख असल्याचे सांगितले. यावर सन्मा. सदस्यांनीही मुळ प्रस्तावात उल्लेख असेल तर सदर प्रस्तावात त्याप्रमाणे सुधारणा करुन घेऊन प्रस्ताव मंजूर करण्यास सहमती दर्शविली.

यावर मा. सभापती यांनी सदर प्रस्तावात पुढील प्रमाणे सुधारणा करावी असे सुचविले. "भक्ती व अभंग हया मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतीतील

निदर्शनास आणले की, एस. आर. ए. योजनेसाठी संक्रमण शिबीरे ठेवली पाहीजेत अशी पध्दत नाही. परंतु शासनाच्या असे लक्षात आले की, केवळ संक्रमण शिबीरात गाळे उपलब्ध नाहीत म्हणून एस. आर. ए. योजना होत नाही. म्हणून त्यांनी मंडळाकडे प्रथम हजार संक्रमण गाळ्यांची मागणी केली. ती मंडळाने पूर्ण केली. नंतर १२०० गाळ्यांची मागणी केली. मंडळाने तेही गाळे दिले. आता २५०० गाळे दिले आहेत. सध्या मंडळाकडे फक्त १२०० गाळे आहेत. त्यातील ४०० गाळे न रहाण्याजोगे आहेत. उरलेल्या ८०० गाळ्यांपैकी ४०० गाळे पावसाळ्यामध्ये आपात्कालिन व्यवस्था म्हणून ठेवावे लागतात. १८० चौ. फू ऐवजी २२५ चौ. फू चे गाळे बांधण्याचे धोरण येणार होते म्हणून मंडळाची पुनर्बांधणीची कामे थांबली होती. सदर धोरण नुकतेच मंजूर झाले असल्याने ह्या आठवड्यात सुमारे ५१ योजनांची कामे सुरु करण्यात येणार आहेत. त्यातील १५-२० योजना त्वरित सुरु करण्यात येतील. त्यासाठी मंडळास २००० संक्रमण गाळे आवश्यक आहेत. त्यामुळे यापुढे एकही संक्रमण गाळा एस. आर. ए. योजनेसाठी देण्यात येऊ नये आणि जर गाळे दिले तर मंडळाचा पुनर्बांधणीचा कार्यक्रम बंद पडेल.. लोकांच्या इमारती दुरुस्त करावयाच्या आहेत, पुनर्रचित करावयाच्या आहेत. त्यासाठी संक्रमण गाळ्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी निदर्शनास आणले की, एस. आर. ए. योजनेसाठी एकही गाळा देण्यात येणार नाही असे मा. सभापती यांनी यापूर्वीही आश्वासन दिले होते. परंतु आजही स्थिती अशी आहे की, बरीच वर्षे संक्रमण शिबीरात खितपत पडलेल्या लोकांना गाळे बदलून देण्यात आलेले नाहीत. परंतु एस. आर. ए. योजनेच्या लोकांना मात्र नवीन संक्रमण गाळे देण्यात आलेले आहेत.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, सदर बाब मा. मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती. परंतु मंत्री महोदयांनी ती विचारात घेतली नाही. आता मात्र शासनाने व मंत्री महोदयांनी ही बाब मान्य केलेली आहे.

मा. सदस्य श्री मोडक यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांच्या कामगार भागामध्ये एस. आर. ए. योजने अंतर्गत काही इमारती घेण्यात आलेल्या आहेत. त्या इमारतीतील लोकांना संक्रमण गाळ्यात जागा दिलेल्या आहेत आणि आता माधव भुवन सारख्याठिकाणी एस. आर. ए. योजना राबविली जात असून संबंधित विकसकाला बोरिवली येथील संक्रमण गाळे देण्यात आले आहेत. त्यांनी पुढे माहिती दिली

की, मुरा ब्रदर्स इमारतीचे प्रकरण मागील ४ वर्षापासून न्यायालयात आहे व त्या इमारतीतील लोक आजपर्यंत मंडळाचे संक्रमण गाळे वापरत आहेत. सदर बाब त्यांनी मागील एका बैठकीत उपस्थित केली होती. त्यावेळी मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले होते की, आपल्याच सरकारने घेतलेला निर्णय असल्यामुळे ते सरकारसमोर कसे मांडू शकतात? खरे तर हा प्रश्न मुंबईतील लोकांशी निगडीत असल्यामुळे अतिशय गंभीर आहे. पुढे त्यांनी असे सुचविले की, मंडळातर्फे नवीन अनेक योजना राबविण्यात येणार असल्यामुळे मंडळालाच आता संक्रमण गाळ्यांची आवश्यकता आहे. म्हणून एस. आर. ए. च्या ज्या योजना अजूनही राबविण्यास सुरवात झालेली नाही व आणाखी काही काळ सुरवात होणार नाही अशा इमारतीतील लोकांना शासनातर्फे/मंडळातर्फे नोटीसा देण्यात याव्यात. व संक्रमण गाळे खाली करुन घ्यावेत.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, मा. सदस्य श्री मोडक यांनी अतिशय मोलाची सूचना केली असून आठवड्यापूर्वीच मा. मंत्री महोदयांनी सूचना दिल्या आहेत की, एस. आर. ए. योजनेसाठी संक्रमण गाळे घेऊनही अद्याप ज्या योजना राबविण्यात आलेल्या नाहीत त्या योजनांसाठी देण्यात आलेले संक्रमण गाळे मंडळास परत करण्याबाबत पत्र लिहावे. याबाबत मंत्री महोदयांस पत्र लिहिलेले असून शासन त्यावर निर्णय देणार आहे. त्यांनी विषयांकित प्रस्तावाबाबत मा. सदस्यांनी विचारणा केल्यानुसार पुढे माहिती दिली की, भक्ती इमारतीमध्ये एकूण १९३ गाळे आहेत पैकी १६८ गाळ्याचे वाटप झालेले आहे व २५ गाळे रिक्त आहेत. सदर २५ गाळे संक्रमण गाळे म्हणून वापरण्यात येतील. अभंग ह्या इमारतीमध्ये एकूण १९० गाळे आहेत. पैकी १२३ लोकांना गाळ्याचे वाटप झालेले आहे व ६७ गाळे रिक्त आहेत. हे ६७ गाळे संक्रमण गाळे म्हणून वापरण्यात येतील. अशाप्रकारे दोन इमारतींत मिळून ९२ रिक्त गाळे असून ते संक्रमण गाळे म्हणून वापरण्यात येतील. ह्या गाळ्यांपैकी एकही गाळा एस. आर. ए. योजनेसाठी देण्यात येणार नाही असा ठराव सर्वानुमते करण्यात आला असून मिळकत व्यवस्थापक [सं. गा.] यांनी या ठरावाची नोंद घ्यावी अशा सूचना मा. सभापती यांनी दिल्या.

२५

[क] विषय- पुनर्रचित इमारतींमधील गाळेधारकांनी व्यापलेल्या गाळ्यांचे न्यायालयीन/ सक्षम प्राधिकारी/अपिल अधिकारी/ यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा दि. ३१. १. ९८ रोजीपर्यंतचा गोषवारा.

विषयांकित गोषवारा पृ. क्र. ४७३ ते ४७५ वर सर्व सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित गोषवाऱ्याची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

ठराव क्रमांक : ५२/४०१

उपमुख्य अधिकारी [पु. गा.] यांनी सादर केलेल्या वरील प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

[अ] विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ६११२९, पुनर्रचित इमारत क्र. ९अ, ब, वाणी चाळ, जे. बी. भातनकर मार्ग, परळ च्या भाडे आकारणीबाबत मा. मंत्री महोदयांनी अधिवेशनामध्ये दिलेल्या आश्वासनानुसार मुख्य अधिकारी यांच्या स्तरावर भाडेकरूंना बोलाऊन त्यांच्यावर अन्याय होणार नाही असा मार्ग काढावा. तसेच मा. मंत्री महोदयांना प्रोग्रेसिव्ह इमारतीबाबत घेतलेल्या चुकीच्या निर्णयाबाबत माहिती देण्यात यावी. यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ब] परेल येथील भक्ती व अभंग या पुनर्रचित इमारतींमधील रिक्त असलेले गाळे मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या दाव टिपणीतील सुधारणेस आधीन राहून संक्रमण शिबीर म्हणून फक्त मुं. इ. दु. व पु. मंडळाच्या अखत्यारितील उपकरपात्र इमारतीतील भाडेकरू/रहिवाशांना देण्यात यावेत. इतर कोणालाही विशेष बाब म्हणूनसुध्दा गाळे वितरीत करण्यात येऊ नयेत, यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

---

३३ २७

बाब क्रमांक : ५२/३ [उपमुख्य अधिकारी [सं.गा.]

विषय- दि. ३१.३.९८ पर्यंत संक्रमण शिबीरातील रिक्त/घुसखोर गाळ्यांची माहिती दर्शविणारा तक्ता.

विषयांकित माहिती पृ.क्र. १७७ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री भूवड यांनी विचारणा केली की, कुलाबा संक्रमण शिबीरातील गाळे केव्हा खाली करण्यात आले ? यावर श्री पाटील, मि. व्य. यांनी माहिती दिली की, कुलाबा संक्रमण शिबीरातील गाळे फेब्रु./मार्च. ९८ मध्ये खाली करण्यात आले व त्या गाळ्यांचे वितरण प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना करण्यात आलेले आहे. आणखीही काही गाळे रिक्त होणार आहेत.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे मत व्यक्त केले की, या संक्रमण शिबीरात जे अनधिकृत लोक रहातात त्यांचीही माहिती देण्यात आली पाहिजे. कुलाबा संक्रमण शिबीरातील जवळजवळ ७० टक्के गाळे अनधिकृत लोकांनी व्यापलेले आहेत. गिरगांव भागातील धोकादायक इमारतीतील भाडेकरूंना, कुलाबा संक्रमण शिबीर जवळ असूनही गोरेगाव, मालवणी अशा दूरच्या संक्रमण शिबीरात पाठविले जाते. परंतु भेंडीबाजार येथील मा. आमदारांच्या चिठ्या आणल्या की त्या लोकांना मात्र कुलाबा संक्रमण शिबीरात जागा दिल्या जातात. ज्या इमारती दुरूस्तीसाठी घेण्यात येतात अशाच इमारतीतील भाडेकरू विशेषकरून कुलाबा संक्रमण शिबीरात आहेत. दुरूस्तीखाली असलेल्या इमारतीतील लोक ७-८ वर्षे झाली तरी तेथील संक्रमण शिबीरात आहेत. त्यांनी पुढे असे मत व्यक्त केले की, इमारतीची दुरूस्ती पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा घालणे आवश्यक आहे. इमारतींची दुरूस्ती पूर्ण झाली आहे किंवा नाही हे कोणी पहात नाही. काही इमारतीची दुरूस्ती पूर्ण होऊन भाडेकरू लोक त्या इमारतीत रहावयास गेले आहेत परंतु संक्रमण शिबीरातील गाळे मात्र त्यांनी भाड्याने दिलेले आहेत व त्यापोटी सुमारे रु. १५०० भाडे द.म. व रु. २५०००/- डिपॉझिट घेतले जाते.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की,

......१३.

३५८

२८

कुलाबा संक्रमण शिबीरातील अधिकृतपणे वितरीत केलेले गाळे सोडून बाकीचे गाळे रिक्त असावयास पाहीजेत. ते गाळे जर रिक्त नसतील तर त्या गाळयांमध्ये कोण रहात आहे? याची पहाणी करण्यात यावी असे मत व्यक्त केले.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, मागील अनेक बैठकांमध्ये कुलाबा संक्रमण शिबीराबावत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. घुसखोरीबाबत विनाकारण संबंधित भाडेवसुली-कारांवर आरोप केले जात आहेत. खरेतर कर्तव्यदक्ष असताना असे प्रकार होणे शक्य नाही. म्हणून पाच लोकांची समिती स्थापन करण्यात यावी. या समितीमध्ये मुख्य अधिकारी, मा. सभापती, यांचा समावेश असावा व सन्मा. संबंधित सदस्यांसह समितीने सदर शिबीरात भेट देऊन समक्ष पहाणी करावी अशी त्यांनी विनंती केली.

मा. सदस्य श्री मोडक यांनी अशी सूचना केली की, समितीस जेव्हा या संक्रमण शिबीरास भेट द्यावयाची असेल तेव्हा त्या भेटीची पूर्वसूचना संबंधित अधिका-यांना व भाडेवसुलीकारांना देण्यात येऊ नये. अचानक भेट देण्यात यावी.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, घुसखोरीच्या प्रकरणात संबंधितांना नोटीस देण्याची गरज नसते. संबंधित भाडेवसुली-काराने वा अधिका-याने घुसखोरी झालेल्या गाळ्याचा नंबर घेऊन पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवून पोलीसांसमक्ष टाळे तोडून गाळा ताब्यात घ्यावा.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी मा. सदस्य श्री सकपाळ यांनी सुचविल्याप्रमाणे पाच जणांची समीती नेमण्यास सहमती व्यक्त केली.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी निदर्शनास आणाले की, त्यांनी गेल्या १० दिवसांत श्री पाटील, मि. व्य. यांच्याकडे कुलाबा संक्रमण शिबीरातील अशा गाळ्यांचे नंबर दिलेले होते की, इमारतीच्या दुरुस्तीच्या नांवाखाली लोक १० ते १२ वर्षे गाळ्यात रहात आहेत. मुख्यत्वेकरुन 'ब.' व 'इ.' विभागातील काही चाळीतील लोक त्या संक्रमण शिबीरात दहाबारा वर्षांपासून रहात आहेत. त्यांनी पुढे अशी सूचना केली की, कार्यकारी अभियंता यांनी मिळकत व्यवस्थापक [सं.गा.] यांना पत्र लिहून दुरुस्ती पूर्ण झालेल्या इमारतींची माहिती द्यावी तसेच मिळकत व्यवस्थापक यांनी संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे याबाबत विचारणा करावी. या दोन

कार्यालयांमध्ये समन्वय होणे गरजेचे आहे.

मा. सदस्य श्री गोडावे यांनी असे मत व्यक्त केले की, कुलाबा संक्रमण शिबीराचा प्रश्न अनेक वेळा उपस्थित होत असतो. तो केव्हा सुटणार हाच प्रश्न आहे? त्यांनी निदर्शनास आणले की, जोगेश्वरीच्या एका दलालाबाबत त्यांनी एक तक्रार दिली होती. त्याबाबत श्री पडसलगीकर पोलीस उपायुक्त यांना पत्र लिहिले होते. पुढे याबाबत काय झाले ते कळलेले नाही.

मा. सभापती यांनी [१] मा. सदस्य ॲड. श्री भूवड,
[२] मा. सदस्य श्री पालकर, [३] मा. सदस्य डॉ. मेहता,
[४] मा. सदस्य श्री उसपकर, [५] मा. सदस्य श्री ठाकूर व
[६] मुख्य अधिकारी किंवा सहमुख्य अधिकारी व मिळकत व्यवस्थापक तसेच ते स्वत: यांची समिती स्थापन करण्यात आल्याचे जाहीर केले. व १० दिवसांत कोणत्या दिवशी पहाणी करावयाची ते समिती ठरवेल व समिती जो काही कार्यक्रम आखेल वा कार्यवाही करील त्याबाबत योग्य ती गुप्तता राखण्याचे सर्वानुमते ठरले.

मा. सदस्य श्री भूवड यांनी अशी सूचना केली की, कुलाबा संक्रमण शिबीरातील एकूण ६८८ गाळ्यांपैकी फक्त एकच गाळा रिक्त दाखविण्यात आला आहे. म्हणजे ६८७ गाळे वितरीत करण्यात आले आहेत. या ६८७ गाळ्यांपैकी किती गाळे अ. ब. क. व ड. विभागातील इमारतींच्या दुरुस्तीसाठी रहिवाशांना देण्यात आलेले आहेत? ८८[३]अ घोषित करण्यात आलेल्या इमारतीतील किती गाळेधारक आहेत? याचे विश्लेषण मिळाले की, दुरुस्तीच्या नांवाखाली जे गाळेधारक रहात आहेत त्यांना इमारतीची दुरुस्ती पूर्ण झाली असल्यास परत मूळ इमारतीत पाठविण्यांत आले आहे का?

मा. सभापती यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, काही ठिकाणी इमारतींची दुरुस्ती पूर्ण झालेली असते. रेकॉर्डवर गाळा मंडळाच्या ताब्यात आल्याचे दाखविण्यात येते. गाळाधारक त्याच्या मुळ इमारतीत जातो. तरीही सदर संक्रमण गाळा भाडेवसुलीकाराच्या संगनमताने किंवा काही अन्य अयोग्य मार्गाने दुसऱ्याला तो दिला जातो.

मा. सदस्य श्री शिवाजीराव यांनी निदर्शनास आणले की, अशी प्रकरणे निदर्शनास आणूनही त्यावर सहा सहा महिने कारवाई करण्यात येत नाही. काही गाळेधारक त्यांच्या इमारतीची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर त्या इमारतीतील गाळा भाड्याने देतात व स्वत: संक्रमण गाळ्यात रहातात.

३२

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांनी दि. २६. ११. ९७ रोजीच्या पत्रान्वये अशाप्रकारची प्रकरणे संबंधित कार्यालयास कळविलेली आहेत परंतु अद्याप त्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

मा. सभापती यांनी मुख्य अधिकारी यांना विनंती केली की, मंडळाच्या ज्या कर्मचा-यांचा अशा प्रकरणात हात असेल त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, ज्या गाळेधारकांना बैठया संक्रमण चाळीत जागा देण्यात आल्या होत्या त्यांना बहुमजली इमारतीतील संक्रमण गाळे गेल्याच आठवड्यात बदलून देण्यात आले. त्या गाळेधारकांनी त्यांच्या जुन्या इमारतीची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर तेथील गाळ्यात भाडेकरू ठेवलेला आहे.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी पावसाळ्यापूर्वी जुन्या इमारतींची पहाणी करण्यात येते त्याप्रमाणे संक्रमण शिबीरांचीही पहाणी करण्यात यावी अशी सूचना केली.

मुख्य अधिकारी यांनी आश्वासन दिले की, तक्रारींची शहानिशा करण्यात येईल व गैरप्रकार करणा-या कर्मचा-यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. पण त्यापूर्वी सविस्तर माहिती मागविण्यात येईल.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी मुख्य अधिकारी यांचे माहिती मागवून कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने अभिनंदन केले व कुलाबा संक्रमण शिबीरास त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी करावी अशी विनंती केली.

मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, काही कर्मचारी/अधिकारी निलंबित झालेले आहेत तर काहींना अटकही झालेली आहे. प्रशासनाची अडचण अशी आहे की, १० लोकांचे काम २ लोक करत आहेत. त्यामुळे कामे करण्यासाठी कर्मचारी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी निदर्शनास आणले की, संक्रमण शिबीरांची सर्व माहिती संगणकीकृत करण्याचे ठरले होते. परंतु अद्याप त्याप्रमाणे कार्यवाही सुरु झालेली नाही. नोंदवह्या ठेवण्याचे ठरलेले असूनही नोंदवह्या ठेवल्या गेलेल्या नाहीत. गेल्या आठवड्यात त्यांनी रिकामी गाळ्यांची माहिती मागविली असता नोंदवह्या न ठेवल्यामुळे ती मिळू शकली नाही.

यावर श्री पाटील, मि. व्य. यांनी माहिती दिली की, रिकामी गाळ्यांची माहिती भाडेवसुलीकाराकडील क्षेत्रनोंदवहीत [फिल्डबुक] नमूद केलेली असते. ही माहिती त्यांच्याकडून दरमहीन्याला घेण्यात येते. किती गाळ्यांचे वितरण झाले व किती गाळे रिक्त आहेत या माहितीच्या आधारे तक्ता तयार करण्यात येतो. असा तक्ता बनविल्यानंतर अनेक गाळ्यांचे वितरण झालेले असते, काही लोकांना ताबा दिलेला असतो. त्यामुळे गाळे किती खाली आहेत याची माहिती संबंधित भाडेवसुलीकारांकडून प्रथमदर्शनी घ्यावी लागते.

मा. सभापती यांनी विचारणा केली की, रिक्त गाळ्यांची माहिती ही भाडेवसुलीकारांच्या क्षेत्रनोंदवहीत उपलब्ध असते त्याचप्रमाणे मुख्य कार्यालयातही उपलब्ध असली पाहीजे अशी पध्दत अनुसरता येईल का?

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, मंडळाच्या अनेक बैठकांमध्ये संक्रमण शिबीर कार्यालयाच्या कामकाजाबाबत चर्चा झालेली आहे. तरीही त्या कार्यालयाचे संबंधित अधिकारी कामकाज सुधारण्यासाठी कोणतीही पाऊले गंभीरपणे उचलत नाहीत. जर भाडेवसुलीकार फसवतो असे लक्षात आले तर अधिकाऱ्यांनी स्वत:कडे माहिती ठेवली पाहीजे. रिक्त गाळ्यांची माहिती सन्मा. सदस्य हे अधिकाऱ्यांनाच विचारणार. व ही माहिती एक महिन्याने मिळणार हे योग्य नाही.

मुख्य अधिकारी यांनी श्री पाटील, मि. व्य. यांना सूचना दिल्या की, संक्रमण गाळ्यांचे वेळोवेळी वितरण होत असते. त्यापैकी काहीजण ताबा घेतात. याबाबतची रोजच्या रोज माहीती उपलब्ध होईल अशी कार्यपध्दती अंमलात आणावी.

मा. सभापती यांनी सदर सूचना योग्य असल्याचे सांगून त्यांनी निदर्शनास आणले की, त्यांच्याकडे काल नगरसेवक श्री दळवी यांनी एक यादी दिली असून त्यात शेट्टे नांवाच्या प्रमुख भाडेवसुलीकाराने दलालांच्या मदतीने किती गाळ्यांची टाळी तोडली आहेत तसेच मालवणी येथील गायकवाड नगर मधील १३० घुसखोर मंडळाकडे कोणतेही भाडे भरत नाहीत असे संबंधित भाडेवसुलीकार सांगतो. याचा अर्थ घुसखोर दोन वर्षापासून भाडे भरत नाहीत व त्यांच्यावर कारवाई करून बाहेरही काढण्यात येत नाही. तरी याबाबत योग्य ती दखल घेऊन संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करावी.

मा. सदस्य श्री भूवड यांनी विचारणा केली की, त्यांनी दोन महिन्यांपूर्वी गाळा क्र. ५३५ व ५३७ चे लीव्ह अँड लायसेन्सचे

ॲग्रीमेंट दिले होते. त्याबाबत पुढे काय कारवाई झाली ?

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी गोरेगांव, जवाहेच येथील बऱ्याचशा संक्रमण गाळ्यांत घुसखोरी झालेली आहे असे निदर्शनास आणले असता मा. सभापती यांनी माहिती दिली की, गोरेगांव संक्रमण शिबिरातील १३० घुसखोरांना सकाळी गाळयातून बाहेर काढल्यानंतर संध्याकाळी पुन्हा ते घुसतात. गाळ्यांच्या खिडक्या, दरवाजे, मंडळाने काढून आणले तरीही घुसखोरी होते. त्यांनी पुढे माहिती दिली की, दहिसर येथील संक्रमण गाळयातील १८५ घुसखोरांना बाहेर काढल्यानंतर संध्याकाळी तेथील लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली पुन्हा त्या गाळयांत घुसखोरी झाली व नंतर मंत्री महोदयांकडून कारवाईस स्थगिती देण्यात आली. त्यांनी सूचना केली की, सर्व सन्मा. सदस्यांनी मिळून मंत्री महोदयांची भेट घेऊन त्यांना घुसखोरांविरुध्दच्या कारवाईस स्थगिती देण्यांत येत असल्यामुळे मंडळ बदनाम होत आहे यांची जाणीव करुन देऊ. मा. सभापती यांच्या या सुचनेनुसार सर्व सन्मा. सदस्यांनी मंत्री महोदयांची भेट घेण्याची तयारी दर्शविली व जर मंत्री महोदय अशाप्रकारे स्थगिती देत राहिले तर लोकप्रतिनिधींना काम करणे कठीण जाईल असे सन्मा. सदस्यांनी मत व्यक्त केले.

मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, हा व्यापक स्वरूपाचा मुद्दा आहे. मंत्री महोदयांनी दिलेली स्थगिती अंमलात आणावयाची कि नाही हा प्रश्न वेगळा. घुसखोरीच्या प्रश्नाकडे वेळोवेळी लक्ष देऊन कारवाई करु शकेल अशी यंत्रणा कायमची उपलब्ध असली पाहिजे. कारण भाडेवसुलीकारांचे संगनमत, पूर्वी ठेवलेल्या सुरक्षारक्षकांचे संगनमत, दलालांचा वावर, पुन्हा पुन्हा होणारी घुसखोरी ह्या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी मंडळाकडे सक्षम अशी यंत्रणा नाही. घुसखोरांबाबत पोलीसांत ३ तक्रार नोंदविण्याच्या सूचना देण्यांत आल्या. ते एक मोठेच काम आहे, परंतु एकदा का पोलीसात तक्रार झाली व कोर्टाकडून स्थगिती मिळाली नाही तर घुसखोर गाळ्यात रहाणार नाहीत. पोलीसांत तक्रार केल्यामुळे घुसखोरांवर नक्कीच वचक राहील असे वाटते.

...२०/-

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, खरे म्हणजे घुसखोर व्यक्तीवर एफ.आर.आर. दाखल न केल्यामुळेच जास्त घुसखोरी होत रहाते. मालमत्ता सरकारची असते व ती दुर्लक्षित केल्यामुळे वारंवार घुसखोरी केली जाते. कोणीही फिर्यादी बनायला तयार होत नाही. त्यामुळे हे प्रकार होतात.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, सर्व घुसखोरांवर एफ.आर.आर. नोंदविणे शक्य नसेल तर किमान पाच सहा घुसखोरांवर एफ.आय.आर. दाखल करण्यात यावेत. म्हणजे त्यांच्यावर झालेल्या पोलीसी कारवाईमुळे बाकीचे घुसखोर तरी घाबरतील.

मा. सदस्य श्री सावरकर, यांनी असे मत व्यक्त केले की, घुसखोरांबाबत जी हताशता: व्यक्त करण्यात येत आहे ती योग्य नाही. याचा अर्थ शासन म्हणून जी कारवाई करणे आवश्यक आहे ती केली जात नाही. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणाले की, पुनर्रचित इमारतीतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मा. सभापती यांनी पोलीसांच्या मदतीने जी कारवाई केली त्यामुळे संबंधितांना अटकही झालेली आहे व त्याचा परिणामही चांगला दिसून आला. तशाचप्रकारे संक्रमण शिबीरातील गैरप्रकारांबाबत खंबीरपणे कारवाई करण्याची वेळ आलेली आहे.

मा. सभापती यांनी सुचविले की, भाडेवसुलीकारांची बदली करणे अतिशय गरजेचे आहे. प्रमुख भाडेवसुलीकार श्री शेट्टे यांच्याबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. तरी त्यांची त्वरित बदली करणे जरुरीचे आहे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी निदर्शनास आणाले की, एक काळ असा होता की, म्हाडामध्ये दलालांचा वावर मोठ्या प्रमाणात होता व तक्रार करणाऱ्यांचे प्रमाणही जास्त होते. परंतु शिवशाहीचे सरकार आल्यानंतर दलाल कमी झाले असून तक्रारदारही कमी झालेले आहेत. ह्याचे मुख्य कारण म्हणजे मा. सभापती यांनी गैरप्रकारांविरुध्द आपल्या कामामध्ये ठसा उमटविला व अनुसरलेल्या कार्यपध्दतीमुळे जी दहशत निर्माण झाली त्यामुळे दलाल आपोआप कमी झाले. म्हणून सुरवातीला ८-१० घुसखोरांविरुध्द पोलीसात तक्रार दाखल केल्या व वर्तमानपत्रात त्याबाबत प्रसिध्दी दिली तर घुसखोरीला आळा बसू शकेल.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, भाडेवसुलीकारांना जी कामे नेमून दिलेली आहेत ती त्यांनी योग्यप्रकारे पार पाडली नाहीत तर त्यांच्याविरुध्द कारवाई का

करण्यात येत नाही? यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, कर्मचा-यांवर कारवाई करुन : निलंबित करण्यात आलेले आहे, बदल्या केलेल्या आहेत, अटकही केलेली आहे. सर्वसन्मा. सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेउन कुलाबा संक्रमण शिबीर व विक्रोळी संक्रमण शिबीर येथे प्रायोगिक तत्वावर कारवाई करण्यात येईल व यापुढे गैरप्रकारांविरुध्द कशाप्रकारे कारवाई करावयाची? याबाबत एक दोन दिवसांत निर्णय घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी निदर्शनास आणले की, दोन-अडीज वर्षांपूर्वी जनमानसात मंडळाची प्रतिमा चांगली नव्हती परंतु आता मात्र ती चांगली आहे. म्हणून मुख्य अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे वैयक्तिकरित्या घुसखोरांविरुध्द पोलीसात तक्रारी दाखल केल्या तर निश्चितच घुसखोरीस आळा बसेल.

वरील प्रदीर्घ चर्चेनंतर संक्रमण शिबीरातील रिक्त घुसखोर गाळ्यांच्या माहितीची नोंद घेण्यात आली.

बाब क्रमांक : ५२/४ [पुनर्बांधणी विभाग].

विषय- इ. क्र. १४-१८, दुसरी कोळीवाडा, माजगांव,
ई. विभाग. मुंबई येथील पुनर्रचित
इमारतीला नांव देण्याबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृ. क्र. १७९ वर सादर करण्यात आला आहे.

इ. क्र. १४-१८, दुसरी काळीवाडा, माझगांव, मुंबई येथील पुनर्रचित इमारतीस सुचविण्यात आलेल्या " शुभांगन" ह्या नांवास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ५२/४०२.

इ. क्र. १४-१८, दुसरी कोळीवाडा, माझगांव, इ. विभाग, मुंबई येथील पुनर्रचित इमारतीस "शुभांगन" हे नांव देण्या सर्वानुमते मं[illegible] देण्यात आली.

मा. सभापती यांना सूचना केली की, उपमुख्य अभियंता श्री वनीकर यांना मा. मंत्री महोदयांकडे एका बैठकीसाठी उपस्थित रहावयाचे असल्यामुळे विषयसूचीनुसार उत्तर परिमंडळातील अंदाजपत्रके प्रथम चर्चेसाठी न घेता दक्षिण परिमंडळाच्या अंदाजपत्रकांवर प्रथम चर्चा करण्यात यावी. त्यानुसार बाब क्रमांक ५२/६ वर चर्चा करण्यात आली.

बाब क्रमांक : ५२/६ [दक्षिण परिमंडळ]

[अ] विषय- इ. क्र. ७-७सी, मंगलवाडी इमारतीच्या सुधारित प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिकच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृ. क्र. द-१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावरील चर्चेअंती मा. सदस्य श्री उसपकर यांनी सदर इमारतीस भेट देण्याची इच्छा व्यक्त केली व त्यास सहमती दर्शवून सदर प्रस्ताव मा. सदस्य श्री उसपकर यांनी भेट देण्याच्या अटीस आधीन राहून मंजूर करण्यात आला.

[ब] विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके पृ. क्र. द-३ ते द-३०७ वर सादर करण्यात आली आहेत.

मा. सभापती यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडे अशी विचारणा केली की, मागील बैठकीत मंडळाच्या सन्मा. सदस्यांनी यांनी जे मुद्दे उपस्थित केले होते त्याबाबत माहिती त्यांनी आणली आहे का? यावर म. न. पा. अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणले की, म. न. पा. च्या विभागीय कार्यालयाने माहिती म्हाडाकडे पाठविली असून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

कारण "सेटबॅक" मागण्यात येते. जर अशाप्रकारे स्थगिती देण्यात येत असेल तर अंदाजपत्रके मंजूर कशासाठी करावयाची? यावर श्री वनीकर, उ.मु.अभि. यांनी खुलासा केला की, सदर इमारतीच्या बांधकामाच्या स्थगितीबाबत मंडळाच्या कार्यकारी अभियंत्यांनी म.न.पा.चे कार्यकारी अभियंता [इमारत प्रस्ताव] . . . यांच्या निदर्शनास ही बाब आणली व काम थांबविण्यासाठी देण्यात आलेली नोटीस ही चुकीची असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले आहे. यावर उपस्थित अधिकारी यांनी सदर बाब त्यांच्या विचाराधीन असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

यावर उपस्थित म.न.पा. अधिकाऱ्यांनी अशी माहिती दिली की, जर इमारतीच्या दुरुस्तीचे काम मंडळामार्फत करण्यात येत असेल तर म.न.पा. तर्फे हस्तक्षेप केला जात नाही. परंतु सदर इमारतीची दुरुस्ती करताना इमारत जोत्यापर्यंत पाडून पुन्हा नवीन बांधण्यात आलेली आहे. जो भाग सेटबॅक मध्ये अंतर्भूत होता तो भाग पुन्हा बांधला गेला. तसेच या इमारतीच्या बाजूला उपकरपात्र इमारत आहे. त्या इमारतीसाठी नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर महानगरपालिकेने त्या ना.ह. प्रमाणपत्रधारकास सेटबॅक सोडून इमारत बांधण्यास भाग पाडले. तेव्हा त्याने म.न.पा. कडे येऊन अशी तक्रार केली की, जर मंडळ सेटबॅकच्या भागावर बांधकाम करीत असेल तर त्याला देखील त्याप्रमाणे बांधकाम करण्यास परवानगी द्यावी. पुढे त्यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाने दुरुस्तीच्या नांवाखाली सेटबॅकमधील भाग हा जशाच्या तसा बांधला आहे. त्यामुळे ना.ह. प्रमाणपत्रधारकाचे म्हणणे रास्त आहे असे वाटते.

यावर मा.सभापती यांनी विचारणा केली की, दुरुस्ती व पुनर्बांधणीची मार्गदर्शक तत्वे म.न.पा. कडे आहेत का? यावर म.न.पा. च्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, तशी मार्गदर्शक तत्वे आहेत. परंतु सेटबॅक मध्ये परवानगी देताना संबंधितांकडून वचनपत्र घेतो तसे या इमारतीच्या बाबतीत घेण्यात आलेले नव्हते. तसेच रिपेअर्स अमाउंट टू रिकन्स्ट्रक्शन करताना शेजारच्या इमारतीचा सेटबॅक क्लिअर झाला आहे का? हे पाहीले जाते. तरी या प्रकरणामध्ये विशेष बाब म्हणून सदर प्रकरण विचारात घ्यावे अशी शिफारस करण्यात आली असून वरिष्ठ अधिकारी त्यावर निर्णय देतील.

श्री वनीकर, उ.मु.अभि. यांनी असे मत व्यक्त केले की, इमारतीची दुरुस्ती चालू असताना इमारतीचा काही भाग कोसळला

५१

कोणती कारवाई करण्यात आली याबाबत संबंधित अधिका-यांचा खुलासा घेण्यात आला पाहिजे. म्हणून संबंधित कर निर्धारक व संकलक यांच्याकडून याबाबतची पूर्ण माहिती घेऊन दोन दिवसांत ती मंडळा कडेसादर करण्यात यावी.

पृ. क्र. द-१०१ वरील इ. क्र. २४-२६, ओल्ड वगलीपूरी या इमारतीच्या प्रस्तावाबाबत चर्चा चालू असताना क्षेत्रफळातील फरकाबाबत विचारणा केली असता श्री वनीकर, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, ब्लॉक प्लॅनमध्ये फक्त तळ+-२ मजल्यांची इमारत आहे. पूर्वीच्या अंदाजपत्रकात तळ+-४ मजल्यांची इमारत दाखविण्यात आली होती. पुढे मागे जर म. न. पा. ने वाढीव क्षेत्रफळ नियमित करून दिले तरच त्या क्षेत्रफळाचा विचारकरण्यात येईल. यावर मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी ती इमारत कोसळली तर पुढे काय? अशी विचारणा केली असता श्री वनीकर, उ. मु. अभि. यांनी खुलासा केला की, इमारत कोसळणार नाही याची काळजी घेतली जाते. जरी वरचे मजले ब्लॉक प्लॅनशी जुळत नसले तरी इमारतीचे अंदाजपत्रक बनविताना जशी इमारत उभी आहे तशीच ती विचारात घेतली जाते. परंतु आर्थिक मर्यादा असल्यामुळे फक्त बिल्टअप एरिया जो ब्लॉक प्लॅनशी जुळतो तेवढाच बिल्टअप एरिया व त्यासाठी आवश्यक तेवढी आर्थिक मर्यादा हया गोष्टी विचारात घेतल्या जातात.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, वरील दोन वाढीव मजले जर १९६० नंतर बांधलेले असतील आणि त्या बांधकामास म. न. पा. ने दंड वगैरे आकारून कुठल्यातरी कलमाखाली नियमित केले असेल आणि ती इमारत कोसळली तर त्या वाढीव मजल्यावरील लोकांच्या पुनर्वसनाची व्यवस्था मंडळाची नाही. फक्त उपकरपात्र इमारतीच्या भागाशी मंडळाचा कायद्याप्रमाणे संबंध असतो.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, उद्या जर इमारत कोसळली तर त्या लोकांनासुध्दा मंडळ संक्रमण शिबीरात जागा देणार व जेव्हा इमारत पुनर्रचित होईल तेव्हा ते ही लोक पुनर्रचित इमारतीतील जागेसाठी हक्क मागणार. त्यांनी पुढे असे मत व्यक्त केले की, हया इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक बनविताना म. न. पा. कडून या इमारतीचे वरील दोन मजले कधी बांधण्यात आले याची माहिती घेण्यात आली पाहीजे होती. यावर श्री वनीकर, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक बनविल्यानंतर म. न. पा. कडे त्याची चेकलीस्ट

४२

पाठविली जाते. मंडळाकडे असलेले: त्या इमारतीचे ब्लॉन प्लॅन मंडळाचे वास्तुशास्त्रज्ञ म. न. पा. कडील ब्लॉक प्लॅनशी पडताळून पहात: असतात. मंडळाचा ब्लॉक प्लॅन म. न. पा. च्या ब्लॉक प्लॅनशी पडताळून पाहील्याशिवाय इमारतीचा बिल्टअप एरिया मंडळ विचारात घेत नाही. दुरुस्तीसाठी घेतलेल्या इमारतीचे खालचे दोन मजले उपकरपात्र असतील आणि वरचे दोन मजले उपकरपात्र नसतील तर त्या वाढीव दोन मजल्यांसाठी मंडळ पैसा खर्च करु शकत नाही. उपकरपात्र इमारतीचा जेवढा अधिकृत बिल्टअप एरिया असेल तेवढ्यासाठीच खर्च करायचा असतो. परंतु खालच्या उपकरपात्र मजल्यावरील लोकांच्या संरक्षणाची जबाबदारी मंडळावर असल्यामुळे आवश्यकता असेल तर वरील बिगर-उपकरपात्र मजल्यांची दुरुस्तीसुध्दा मंडळास नैतिकदृष्टया करावी लागते. दुरुस्तीच्या निकषांप्रमाणे तसे करणे क्रमप्राप्त असते. जर वाढीव बांधकाम म. न. पा. ने नियमित केले असेल तर म. न. पा. ने मंडळास तसे कळविले पाहीजे. म्हणजे त्या वाढीव बिल्टअप एरियासाठी सुधारित अंदाजपत्रक सादर करता येईल.

वरील चर्चेनंतर सदर अंदाजपत्रक मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

पृ. क्र. द-२१३ वरील इमारत क्र. २३३-२३३-अ, वाळकेश्वर रोड या प्रस्तावाबाबत मा. सदस्य श्री उसपकर यांनी नॉन-स्ट्रक्चरल काम जास्त असल्यामुळे इमारतीस भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे सदर अंदाजपत्राक भेट देण्याच्या अटीवर मंजूर करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ५२/४०३ .

दक्षिण परिमंडळातील सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती खालीलप्रमाणे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले.

[१] इ. क्र. ७-७सी, मंगलवाडी या इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेवरील जादा खर्चास सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

[२] दक्षिण परिमंडळातील परिशिष्ट "अ" मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या प्रस्तावांना सन्मा. सदस्यांनी घेतलेल्या हरकती व मांडलेल्या सुचनांच्या आधीन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ५२.५ [उत्तर परिमंडळ].

[१] विषय- अनुपालन अहवाल.

उत्तर परिमंडळाचा अनुपालन अहवाल पृ.क्र. ३-अ वर सादर करण्यात आला आहे.

सचिव यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले होते त्या अनुषंगाने अनुपालन अहवाल सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती अनुपालन अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

---

[२] विषय- म्हाड अधिनियम ८८[३]अ अंतर्गतच्या प्रस्तावांना मंजूरी मिळणेबाबत.

अ] इ.क्र. २२-बी, दत्त निवास, नानाभाई पालकर मार्ग, परळ गांव.

ब] इ.क्र. ९२, वीच क्राफ्ट बिल्डिंग, रानडे रोड, दादर [प.], मुंबई.

......

उपरोल्लेखित दोन्ही प्रस्ताव पृ.क्र. उ-१ ते उ-७ व उ-९ ते उ-१३ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांवर चर्चा करताना मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, दुरूस्तीचा खर्च रु. ९०८/- दाखविण्यात आला आहे. व रु. १०००/- च्या मर्यादेचे धोरण शासनाने नुकतेच जाहीर केलेले आहे. तरी प्रत्यक्ष आदेश मिळेपर्यंत सदर प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा म्हणजे वाढीव पैशात इमारतीची दुरुस्ती करणे शक्य होईल असे वाटते.

ठराव क्रमांक :५२/४०४.

[१] म्हाडा अधिनियम ८८[३]अ अंतर्गतच्या खालील दोन्ही प्रस्तावांना सविस्तर चर्चेअंती मान्यता देण्यात आली.

[अ] इ. क्र. २२-बी, दत्त निवास, नानाभाई पालकर मार्ग,
[ब] इ. क्र. ९२, बीचक्राफ्ट बिल्डिंग, रानडे रोड, दादर [पश्चिम], मुंबई.

[२] इ. क्र. १५३-१८२, शिवराम चाळ, दत्ताराम लाड मार्ग या इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या दुसऱ्या टप्प्याच्या सुधारित अंदाजपत्रकाच्या रुपये ५,०६,५९४/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

[३] उत्तर परिमंडळातील परिशिष्ट-ब मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या प्रस्तावांना सन्मा. सदस्यांनी घेतलेल्या हरकती व सूचनांच्या आधीन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-: अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घेण्यात येणारे विषय :-

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील जुन्या उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे खालील चार प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांना सादर करण्यात आले.

[१] भूकर पहाणी क्रमांक-१४९९ व १/१४९९, गिरगांव विभाग, इ. क्र. १७, मॅथ्यू रोड, उपकर क्र. डी-१५२०-१-२, ऑपेरा हाउस, मुंबई.

[२] अंतिम भूखंड क्र. ४६५, नगररचना योजना क्र. ४, माहीम विभाग, इ. क्र. १६-सी, दादर गल्ली, अमृत भवन, मुंबई.

[३] भूकर पहाणी क्र. ९३४, माहीम विभाग, उपकर क्र. जी-५०३६, लोहार चाळ स्ट्रीट, जी/एन विभाग, माहीम, मुंबई.

[४] भूकर पहाणी क्र. ६५३, गिरगांव विभाग, इ. क्र. ११-१३, डॉ. देशमुख लेन, इ. विभाग, गिरगांव, मुंबई.

वरील प्रस्तावांवर चर्चा करताना मा. सभापती यांनी माहिती दिली की, शासन" अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींना वाढीव च.क्षे. नि. २.५ देण्याचे मान्य केलेले आहे व याबाबत लवकरच आदेश देण्यात येणार आहेत. जेणेकरुन जास्तीत जास्त घरमालक/ भाडेकरु या योजनेचा लाभ घेतील. वरील चारही प्रस्तावांमध्ये ७० टक्के भाडेकरु/रहिवाशांची संमती असून विकसक

प्रचलित देय असलेला २.०० च.क्षे.नि. घेऊन इच्छितात. तसेच संबंधित विभागामार्फत सदर प्रस्तावांची छाननी करण्यात आलेली आहे.

सविस्तर चर्चेअंती चारही प्रस्तावांना २.०० किंवा मूळ इमारतीत वापरण्यात आलेला च.क्षे.नि. देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक : ५२/४०५

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतीच्या पुनर्विकासाठी खालील चारही प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्रा प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[१] भूकर पहाणी क्र. १४९९ व १/१४९९, गिरगांव विभाग, इ.क्र. १७, मॅथ्यू रोड, उपकर क्र. डी-१५२०-१-२, ऑपेरा हाऊस, मुंबई.

[२] अंतिम भूखंड क्र. ४६५, नगररचना योजना क्र. ४, माहीम विभाग, इ.क्र. १६-सी, दादर गल्ली, अमृत भवन, मुंबई.

[३] भूकर पहाणी क्र. ९३४, माहीम विभाग, उपकर क्र. जी-५०३६, लोहार चाळ स्ट्रीट, जी/एन. विभाग, माहीम, मुंबई.

[४] भूकर पहाणी क्र. ६५३, गिरगांव विभाग, इ.क्र. ११-१३, डॉ. देशमुख लेन, इ. विभाग, गिरगांव, मुंबई.

---

[२] विषय- पुनर्रचित गाळ्याचे नियमितीकरण/ वारसाहक्काने हस्तांतरण.

उपरोक्त बाब टिपणी उपमुख्य अधिकारी[पु.गा.] यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांना सादर केली.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने चर्चा करताना मा. सभापती यांनी माहिती दिली की, मुख्य अधिकारी यांच्या सहीचे मिळकत व्यवस्थापन विभागासंबंधी एक पत्र काढण्यात आले आहे. सदर पत्रामध्ये गाळे हस्तांतरण व नियमितीकरणाबाबत माहिती देण्यात आली. याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केली की, त्यांनी

६३

सभागृहात वस्तुस्थिती सांगून मा. सदस्यांच्या सूचना असल्यास त्यांची नोंद घेण्यात यावी.

श्री तेरदाळकर, मि. व्य. यांनी माहिती दिली की, नियमितीकरणासाठी मुख्यत्वे आवश्यक त्या पुढील गोष्टींची तपासणी करण्यात येते.

१] ग्रीन फॉर्म, २] का. अ. /दुरुस्ती विभाग अगर पुनर्रचना विभाग यांचेकडून प्राप्त झालेली भाडेकरूंची यादी, ३] मुळ इमारतीची वितरण नस्ती पाहून त्यामधील मुळ भाडेकरूंची नांवे.

अर्जदाराने ज्या मुळ भाडेकरूकडून गाळा घेतला त्याचे नांव ग्रीनफॉर्म मध्ये आहे कींवा नाही हे पहाण्यात येते. नांव नसेल तर कार्यकारी अभियंता यांच्याकडून "अ" "ब" फॉर्ममध्ये इमारतीच्या सर्व मुळ भाडेकरूंची नांवे असतात त्यामध्ये त्याचे नांव आहे की नाही ते पाहीले जाते किंवा इमारतीची वितरण नस्ती असते त्यामध्ये असलेल्या भाडेकरूंच्या यादीत त्याचे नांव असावे लागते. परंतु मूळ भाडेकरूचे नांव वरील कोणत्याही कागदपत्रात उपलब्ध नसेल तसेच नियमितीकरणासाठी ज्या व्यक्तीने अर्ज केलेला आहे त्याच्याकडेही कोणते आवश्यक ते कागदपत्रे नसतील तर नियमितीकरण कशाच्या आधारे करावयाचे? हा प्रश्न असतो. म्हणून सदर बाब मंडळासमोर मांडण्यात आली आहे.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, वर्षानुवर्षे सदर भाडेकरू संक्रमण शिबीरात रहात असतो व त्याने खोली दुसऱ्या व्यक्तीस विकली व विकत घेणाऱ्या व्यक्तीकडून मंडळ कागदपत्र मागविते. पण त्याच्याकडे ते उपलब्ध नसतात. शिवाय मंडळाकडेही कागदपत्रे शोधूनही उपलब्ध होत नाहीत. मग मंडळ किती वर्षे त्या व्यक्तीच्या नांवावर खोली करणार नाही? खोली नांवावर न केल्यामुळे नियमितीकरणाची जी रक्कम त्याच्याकडून येणे असते ती मंडळास मिळत नाही. त्यामुळे मंडळाचेच आर्थिक नुकसान होत असते.

यावर श्री तेरदाळकर, मि. व्य. यांनी असे निदर्शनास आणले की, नियमितीकरणासाठी अर्ज करणारी व्यक्ती जरी वर्षानुवर्षे गाळ्यात रहात असली तरी त्या व्यक्तीचा हक्क सिध्द होत नाही. कारण त्याने ज्या मुळ भाडेकरूकडून गाळा विकत घेतलेला असतो त्याच्याकडून व्हेकेशन नोटीस, संक्रमण गाळ्याचे वितरणपत्र, भाडे पावत्या, अनामत रक्कमेची पावती इत्यादी आवश्यक ते

कागदपत्र त्याने घेतलेले नसतात. किंवा गाळा विकत घेण्यापूर्वी ती व्यक्ती मंडळाचा भाडेकरू आहे का? याबाबत चौकशी करावयास पाहिजे होती. लोकांची फसवणुक होऊ नये म्हणून मंडळाने वर्तमानपत्रात जाहीरात देऊन आवाहनही केले आहे की, एखादी खोली विकत घेण्यापूर्वी मंडळाच्या कार्यालयात येऊन ज्या व्यक्तीकडून गाळा विकत घेणार आहे ती व्यक्ती मुळ भाडेकरू आहे की नाही याबाबत चौकशी करण्यात यावी.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, सर्वच नागरिक वरील गोष्टी विचारात घेऊन वागणारे नसतात. आवश्यक ते कागदपत्र गाळा विकत घेणा-या व्यक्तीकडे किंवा मंडळाकडे उपलब्ध नसतील तर त्या व्यक्तीकडून मंडळाने क्षतिपूर्तीबंधपत्र घ्यावे.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, यात महत्वाचा मुद्दा असा आहे की, जर अर्जदाराकडे किंवा मंडळाकडे नियमितीकरणासाठी आवश्यक असणारे कागदपत्र उपलब्ध नसतील तर मुळ भाडेकरूला जे गाळयाचे वाटप झालेले आहे ते खोटया कागदपत्रांच्या आधारे झालेले आहे किंवा कसे हे पहाणे गरजेचे असते. जर गाळा खरेदी व विक्रीचा व्यववहार मुळ भाडेकरूबरोबर झाला असेल व दुर्दैवाने कागदपत्र उपलब्ध नसतील तर अशाप्रकरणी प्रतिज्ञापत्र किंवा क्षतिपूर्तीबंधपत्र घेणे योग्य होईल. मुळ भाडेकरू आहे किंवा नाही हे कळून घेण्यासाठी मतदार यादी पहाण्यात यावी. मुळ भाडेकरू वर्षानुवर्षे रहात असेल तर जुने रेशनकार्ड, विचारात घेऊ शकतो. परंतु मूळ वितरण खरे झाले आहे की खोटया कागदपत्रांच्या आधारे झाले आहे हे ओळखणे कठीण आहे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, एखादी मुळ इमारत दोन मजल्यांची असेल व ३४ गाळे असतील आणि मंडळातर्फे जेव्हा सदर इमारतीची पुनर्रचना करण्यात येते तेव्हा ६४ भाडेकरूंची यादी दाखविली जाते. हया वाढलेल्या भाडेकरूंच्या यादीस मंडळाचेच अधिकारी जबाबदार असतात. या परिस्थितीत अर्जदार व्यक्ती गाळयात रहात असल्यामुळे तीला घुसखोर म्हणून जाहीर करावे लागेल नाही तर त्या व्यक्तीकडून तो घुसखोर नाही हे सिध्द करणारे कागदपत्रे घ्यावे लागतील. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, पुनर्रचित इमारत सागर, चैतन्य, परिजात, सहजीवन हया मुळ इमारतींचे कोणतेही कागदपत्र मंडळाच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत. आणि रहिवाशी वर्षानुवर्षे पुनर्रचित इमारतींत रहात आहेत. परंतु

६६७

खोल्या नांवावर केल्या जात नाहीत. त्यांना किती दिवस रखडवायचे? म्हणून अशा परिस्थितीत अर्जदाराकडून क्षतिपूर्तीबंधपत्र लिहून घ्यावे की, तो रहात असलेल्या गाळ्यावर जर दुसऱ्याने कोणी दावा दाखल केला व त्याचा दावा खरा निघाला तर त्याने गाळा खाली करावा.

यावर मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, ६ ओव्हळ वाडी या इमारतीचे लोक त्यांच्याकडे आले होते त्यांनी इमारत का पुनर्रचित झाली नाही? अशी विचारणा केली. तेव्हां असे लक्षात आले की, मूळ भाडेकरू ११ असताना त्यांची संख्या २१ दाखविण्यात आली. खरे मूळ ११ भाडेकरू होते ते संक्रमण शिबीरात आहेत आणि जे खोटे १० भाडेकरू वाढवून दाखविण्यात आले आहेत ते गिरगांवमध्ये मा. मंत्री महोदयांचे आदेश घेऊन राहीले. सदर खोटया भाडेकरूंनी खोल्या विकल्या व विकत घेणाऱ्या व्यक्तीने गाळा नांवावरकरण्यासाठी अर्ज केला तेव्हा लक्षात आले की, ज्याच्याकडून गाळा विकत घेतला त्या व्यक्तीने खोटया कागदपत्रांच्या आधारे पुनर्रचित इमारतीत गाळा मिळविला आहे.

यावर श्री तेरदाळकर, मि. व्य. यांनी निदर्शनास आणले की, अशा प्रकरणाचा मुख्य अधिकारी यांच्या पातळीवर निर्णय घेऊन निपटारा करण्यात यावा. यावर मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, अर्जदार व्यक्तीकडे वा मंडळाकडे कोणतेही पुरावे नसतील तर अर्जदार व्यक्ती नोकरी करीत असेल तर त्याच्या सर्व्हीस बुकमध्ये पत्ता उपलब्ध असेलच. पासपोर्ट, ड्रायव्हींग लायसेन्स, मतदार यादी वगैरे पुरावे मिळू शकतात. ते कोठे व केव्हापासून नोकरी करतात, त्यांची मुलेबाळे असतील त्यांची नांवे महानगर-पालिकेकडे नोंद केलेली असतीलच. या आधारे नियमितीकरण करणे शक्य आहे. त्यानी पुढे असे मत व्यक्त केले की, जी प्रलंबित प्रकरणे आहेत त्या प्रकरणांची यादी तयार करावी व त्यांना वरीलप्रमाणे आवश्यक ते पुरावे सादर करावयास कळवावे. तदनंतर त्या प्रकरणाचा निपटारा करणे सुलभ होईल.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असा मुद्दा मांडला की, मंडळाच्या ठेकेदारांना म. न. पा. चे काम करता येत नाही. कारण ते मंडळाकडे नोंदणीकृत झालेले असतात. त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भागात देखील मंडळाच्या ठेकेदारांना काम

करता येत नाही. अशा ठेकेदारांना मंडळाकडे काम करण्याची परवानगी दिली तर मंडळामध्ये काम करणारे जे ठेकेदार आहेत त्यांच्यावर अन्याय होणार नाही का?

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, याबाबतचा निर्णय प्राधिकरणामध्ये सविस्तर चर्चेअंती घेण्यात आलेला आहे. मंडळामध्ये बरीच वर्षे ठेकेदार असल्यामुळे त्यांची मोनोपॉली झालेली आहे. म्हणून शासनाने असा निर्णय घेतला की, त्यांची मोनोपॉली तोडावयाची असेल तर सा. बां. विभागासारख्या खात्यातील ठेकेदारांना सुध्दा मंडळाची निविदा भरता येईल. यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी निदर्शनास आणले की, बाहेरच्या ठेकेदारांना जर निविदा भरण्याची मुभा असेल तर त्यांनी नियमाप्रमाणे मंडळाकडे नोंदणी केलेली असली पाहीजे. यावर अधिक माहिती देताना श्री भूवनदास यांनी सांगितले की, बाहेरचे ठेकेदार हे म्हाडामध्ये नोंदणीकृत नाहीत हे खरे आहे. परंतु प्राधिकरणाच्या अशा सूचना आहेत की, सदर ठेकेदार म. न. पा. कडे जर नोंदणीकृत असले तरी त्यांना मंडळाची कामे देण्यात यावीत.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी अशी सूचना केली की, कोणताही ठेकेदार मग तो सां. बां. विभागाचा असो की, म. न. पा. असो तो म्हाडासाठी काम करत असेल तर म्हाडामध्ये अधिकृत नोंदणी झालेला असलाच पाहीजे. तसे असेल तरच तो काम करु शकतो. जोपर्यंत तो मंडळाच्या लीस्टवर येत नाही तोपर्यंत त्याला काम देण्यात येऊ नये.

श्री भूवनदास यांनीही या मताशी सहमती व्यक्त करुन असे निदर्शनास आणले की, याबाबतचा अहवाल मुख्य अभियंता यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री सातम यांनी असे मत व्यक्त केले की, एखाद्या ठेकेदाराला जर स्विकृत यादीवर घ्यावयाचे असेल तर त्याने कोठे कोठे कशा प्रकारचे काम केलेले आहे, कशा पध्दतीने काम केलेले आहे हे सर्व पाहूनच स्विकृत यादीवर घेण्याची पध्दत आहे. अशा त-हेने जर ठेकेदाराची निवड झाली तरच चांगल्या दर्जाचा ठेकेदार मिळू शकतो.

यावर उ. मु. अभि. श्री भूवनदास यांनी माहिती दिली की, वरील गोष्टी रजिस्ट्रेशनच्या वेळी पाहील्या जातात. तद्नंतरच रजिस्ट्रेशन दिले जाते.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, शासनाचे असे म्हणणे आहे की, सां. वां. वि, मुं. इ. दु. व पु. मंडळ व म. न. पा. हे एकच शासकीय-निमशासकीय भाग आहेत. मंडळाच्या ठेकेदारांना काम द्यायचे की नाही हा त्या त्या शासनाच्या खात्याचा धोरणात्मक प्रश्न आहे.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, जर मंडळाच्या ठेकेदारांना शासनाच्या इतर खात्यांचे काम करता येत नसेल तर इतर खात्याच्या ठेकेदारांना मंडळाचे तरी काम का द्यावे?

मा. सभापती यांनी यावर निदर्शनास आणले की, मंडळाच्या ठेकेदारांची मक्तेदारी संपविण्यासाठी इतर खात्यांच्या ठेकेदारांना मंडळाचे काम करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, जे ठेकेदार बरीच वर्षे मंडळाचे काम करत आहेत त्यांच्यावर हा अन्याय आहे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे मत व्यक्त केले की, इतर खात्याच्या ठेकेदारांना म्हाडाचे रजिस्ट्रेशन घेण्यास भाग पाडावे

मुख्य अधिकारी यांनी विचारणा केल्यावरुन श्री भुवनदास यांनी माहिती दिली की, रजिस्ट्रेशन करताना जी कामे करावयाची असतात त्या कामांचा त्यांचा पूर्वीचा अनुभव, त्यांची पात्रता वगैरे आवश्यक त्या बाबी पाहील्या जातात व नंतरच त्यांना रजिस्ट्रेशन दिले जाते.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत मांडले की, मंडळाकडे सध्या असलेल्या ठेकेदारांची मक्तेदारी मोडण्यासाठी ठेकेदारांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. परंतु प्रत्येक ठेकेदाराला मंडळाचे रजिस्ट्रेशन घेणे भाग पाडावे. या सूचनेशी मा. सभापती व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली तर श्री भुवनदास यांनी सदर निर्णय हा प्राधिकरणाने घेतलेला असल्यामुळे निर्णयासाठी हा विषय पुन्हा प्राधिकरणाकडे पाठवावा लागेल असे निदर्शनास आणले.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, ३४७, वाणी चाळ, डिलाईल रोड येथील सहा धोकादायक इमारतींपैकी ३ इमारती इतक्या धोकादायक आहेत की, कोणत्याही क्षणी त्या इमारती कोसळण्याची भिती आहे. या सहाही मालमत्तांचे मंडळाने भूसंपादन केलेले आहे. भूसंपादन झाल्यापासून आतापर्यंत केवळ बोर्ड लावण्यापलिकडे काहीही प्रगती झालेली नाही. इमारतीत लोक रहात असून जर त्या कोसळल्या तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता

आहे. त्यांनी सदर इमारतीस मुख्य अधिकारी यांनी त्यांच्यासह भेट द्यावी व लोक कशा परिस्थितीत इमारतीत रहात आहेत ते पहावे अशी विनंती केली. तसेच रहिवाशांना त्वरित संक्रमण शिबीरात हलविण्यात यावे अशी मागणी केली.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, धोकादायक इमारतीतील जे लोक खोल्या खाली करत नसतील त्यांना पोलीसबळ वापरुन खोल्या खाली करुन घेऊन संक्रमण शिबीरात हलविण्यात यावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत एकही अपघात होणार नाही याची काळजी घ्यावी.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असा मुद्दा मांडला की, भायखळा सेवा केंद्र या संस्थेने खासदार फंडातून व्यायाम शाळा बांधण्यासाठी म्हाडाच्या जागेसाठी त्यांना ना हरकत प्रमाणपत्र पाहीजे असा अर्ज त्यांनी मा. सभापती यांजकडे केला आहे व स्वत:च्या पत्रासह त्यांनी सदर निवेदन मुख्य अधिकारी यांना दिलेले आहे. म. न. पा. कडून आवश्यक असणारे कागदपत्र त्या संस्थेने अर्जासोबत सादर केलेले आहेत. जागा म्हाडाची असल्यामुळे व्यायामशाळेसाठी परवानगी देण्यास हरकत नाही.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असा विषय मांडला की, कुलाबा संक्रमण शिबीरात आमदार फंडातून व्यायामशाळा बांधण्याचे ठरले आहे. जोत्याचे बांधकाम करण्यात आलेले आहे. परंतु त्यांच्या माहितीप्रमाणे आपल्या मंडळाकडे अशाप्रकारचा प्रस्ताव आलेला नाही. मग या बांधकामास परवानगी दिली कोणी ?

यावर मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, असे प्रस्ताव मुं. इ. दु. व. पु. मंडळासमोर यावे लागतात व मंडळाने त्यास मान्यता दिल्यानंतर जागा मुंबई मंडळाची असल्यामुळे प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे पाठवावा लागतो.

श्री भूवनदास यांनी माहिती दिली की, व्यायामशाळा बांधण्याबाबतचा प्रस्ताव त्यांच्याकडे आलेला आहे. परंतु तेथे पुनर्विकास योजना राबविण्यात येणार असल्यामुळे तो प्रस्ताव मंडळासमोर ठेवण्यात आलेला नाही. यावर मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, कुलाबा संक्रमण शिबीरातील चाळी तोडून तेथे बहुमजली संक्रमण शिबीरे बांधण्यात येणार असल्यामुळे अशाप्रकारच्या कामांना

७५

परवानगी देण्याचा प्रश्नच येत नाही. जर बांधकाम करण्यात येत असेल तर ते त्वरित थांबविण्यात यावे.

मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, झोपडपट्टी सुधार मंडळ हा म्हाडाचाच एक भाग असला तरी त्या मंडळाने असा प्रस्ताव मांडणे अयोग्य आहे. सदर बांधकाम आमदार फंडातून होणार असले तरी त्यासाठी लागणारा पैसा हा शासनाचा/लोकांचाच पैसा असतो. तो पैसा लोकप्रतिनिधी किंवा अधिकारी स्वत:च्या खिशातून खर्च करत नसतात. त्यामुळे उद्या जरी बांधकाम तोडले तरी सगळा पैसा फुकट जाणार. ठेकेदार त्यांच्या कामाचे पैसे घेऊन मोकळा होईल व लोकांनाही पुढे त्याचा काही फायदा होणार नाही. जरी झो. सु. मंडळाकडून सदर प्रस्ताव आला असला तरी संबंधित अधिका-यांनी तेथे राबविण्यात येणा-या पुनर्विकासाची माहिती त्या मंडळास दिली पाहीजे होती.

मा. सदस्य श्री भुवड यांनी असे मत व्यक्त केले की, सदर संक्रमण शिबीर हे स्लमसाठी आंदणच दिल्यासारखे आहे. तेथे बांधलेले संरक्षक कठडे रहात नाहीत. सदर शिबीरास प्रवेशव्दार बांधण्याचा प्रस्ताव त्यांनी दिला असून त्या प्रस्तावावर काहीच विचार केला जात नाही.

मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, सदर बांधकाम तोडण्यासाठी त्वरित पाऊले उचलून दबाव आल्यास पोलीसांच्या मदतीने बांधकाम तोडून टाकण्यात यावे.

मा. सदस्य श्री भुवड यांनी पुढे असा विषय मांडला की, इ. क्र. १९४, जे. एस. एस. रोड ही इमारत १९७८ साली पाडण्यात आली. त्या इमारतीतील जगन्नाथ मोरे या रहिवाशाच्या दोन खोल्या होत्या. एकत्र कुटुंब पध्दत असल्यामुळे त्यांनी दोन वेगवेगळी रेशनकार्ड केलेली नव्हती. त्यांच्याकडे दोन व्हेकेशन नोटीसा आहेत. संक्रमण शिबीर, गोरेगाव येथे दोन खोल्या त्यांना मिळाल्या आहेत. त्यांना बृहत्सूचीवर घेण्यात आले असून त्यांना एकच गाळा कोकण वैभव ह्या पुनर्रचित इमारतीत देण्यात आला आहे.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, त्यांनी म मुख्य अधिकारी यांनी या विषयावर चर्चा केली असून असा निर्णय घेण्यात आला आहे की, एखाद्या व्यक्तीच्या नावे जुन्या चाळीत दोन खोल्या असतील, व्हेकेशन नोटीसा दोन असतील, तर पुनर्रचित इमारतीत त्यांना दोन जागा देण्यात आल्या पाहीजेत.

मा. सदस्य श्री भूवड यांनी अशी सूचना केली की, व्हेकेशन नोटीसवर क्षेत्रफळही नमूद करण्यात यावे. सदर सूचनेस सर्वांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री साटम यांनी असे निदर्शनास आणले की, पूर्वी जुन्या इमारतीतील लोकांना पुनर्रचित इमारतीत जागा देतानाच ती कोणतेही हस्तांतरण शुल्क न आकारतानांवावर करुन मिळत असे. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, या विषयाबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असा मुद्दा मांडला की, वारसाहक्कामध्ये आई, वडील, मुले यांचा समावेश केला जातो. परंतु न्यायालयाने मुलीचाही हक्क ग्राह्य धरलेला आहे. एका प्रकरणी एका विवाहित मुलीचे दोन्ही भाऊ व वडील वारले. आईचे असे म्हणणे आहे की, ती विवाहित मुलगीच तिचे पालनपोषण करते. म्हणून तिच्या नांवावर खोली करण्यासाठी तिने अर्ज केला असता संबंधित विभागाने तिच्याकडूनही रु. २०,०००/- नियमितीकरणासाठी मागितले आहेत. खरेतर ती मुलगी तिची कायदेशीर वारस आहे.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, जरी मा. सदस्यांचा मुद्दा रास्त असला तरी अडचणी अशा आहेत की, त्यांच्याकडे विचारार्थ आलेल्या अशाच एका प्रकरणी आईने प्रतिज्ञापत्र सादर केले की, तिला एकच मुलगी असून तीच तिचे पालनपोषण करीत आहे, म्हणून गाळा तिच्या नांवावर करण्यात यावा. परंतु तिने सादर केलेले प्रतिज्ञापत्र खोटे होते असे नंतर दिसून आले. कारण तिच्याच एका दुसऱ्या मुलीने येऊन माहिती दिली की, तिच्या आईने खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले असून प्रत्यक्षात पाच बहीणी असून त्या सर्वांचा त्या खोलीवर हक्क आहे. त्या मुलीने सांगितले की, तिच्या आईने खोटे प्रतिज्ञापत्र सादर केलेले असल्यामुळे मंडळाने तिच्या आईवर खटला दाखल करावा. अशाप्रकारचा अडचणी येत असतात.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असा मुद्दा मांडला की, व्हेकेशन नोटीस देताना मुळ भाडेकरुचे नांव त्यावर लिहिण्यात

येते. परंतु प्रत्यक्ष रहाणा-या व्यक्तीचे नांव व्हेकेशन नोटीसवर काही वेळा लिहिण्यात येत नाही. त्यामुळे पुनर्रचित इमारतीत जागा देताना मंडळातर्फे त्या व्यक्तीला मुळ भाडेकरुस हजर करण्यास सांगितले जाते. खरे तर म्हाडा कायदा १९७६ मध्ये असा कोठेही उल्लेख नाही की, नवीन जागेचा तावा मुळ भाडेकरुलाच दिला जावा. यावर मुख्य अधिकारी यांनी निदर्शनास आणाले की, अशाप्रकारची प्रकरणे ही वैयक्तिकरित्या हाताळावी लागतात. सर्व सन्मा. सदस्यांच्या सूचना लक्षात घेऊन याबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात येतील.

मा. सदस्य श्री मोडक यांनी असे मत व्यक्त केले की, अनेक रहिवाशी वरीच वर्षे गाळयात रहात असूनदेखील पुनर्रचित इमारतीतील गाळा नांवावर करण्यासाठी रु. २०,०००/- आकारले जातात. मागील बैठकीत जे रहिवाशी व्हेकेशन नोटीस देण्यापूर्वी किमान ५ वर्षे रहात असतील त्यांच्या नांवावर खोल्या करताना ५० टक्के रक्कम म्हणजे रु. १०,०००/- शुल्क आकारण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे रु. १०,०००/- आकारण्यास सुरवात झाली आहे का? यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, मंडळाच्या अधिका-यांच्यामते जेव्हा ठरलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कम आकारण्याचा जेव्हा प्रश्न असतो तेव्हा ती बाब प्राधिकरणाकडे पाठवावी लागते. म्हणून या विषयाबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण यांचा सल्ला घेऊन पुढील बैठकीत हा विषय ठेवण्यात येईल.

मा. सदस्य श्री मोडक यांनी अशी सूचना केली की, पावसाळयापूर्वी मंडळातर्फे जुन्या इमारतींचे सर्वेक्षण केले जाते. तरीही काही जुन्या इमारती कोसळतात. म्हणून इमारतींची पहाणी करताना त्या भागातील मा. सदस्य व इतर जे कोणी लोकप्रतिनिधी असतील त्यांनाही बरोबर नेण्यात यावे. कारण लोकप्रतिनिधी त्या भागातील असल्यामुळे त्यांना त्यांच्या भागातील कोणत्या इमारती किती धोकादायक आहेत याची कल्पना असते व जर मंडळाच्या अधिका-यांच्या नजरेतून एखादी धोकादायक इमारत सुटली तर तिची माहिती हे लोकप्रतिनिधी देऊ शकतील.

मा. सभापती यांनी असे सुचविले की, मा. सदस्यांनी त्यांच्या मते धोकादायक असलेल्या इमारतींची यादी मंडळास द्यावी म्हणजे मंडळातर्फे पहाणी करण्यात येणा-या धोकादायक इमारतींमध्ये त्यांची नांवे नसतील तर ती समाविष्ट करुन त्यांची पहाणी करता येईल.

 ८२

मा. सदस्य श्री. मोडक यांनी अशी सूचना केली की, दुरुस्तीसाठी घेण्यांत आलेल्या इमारतींची पहाणी करेचवेळा संबंधित वास्तुशास्त्रज्ञ स्वत: करीत नाहीत. त्यामुळे ठेकेदार त्यांच्या मनाप्रमाणे दुसरेच दुरुस्तीचे काम करतो व त्यामुळे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्याची पाळी येते. तरी इमारतीची दुरुस्ती करण्यापूर्वी एकदाच सर्व बाबींची पहाणी व्यवस्थीत केल्यास इमारतीची दुरुस्ती वारंवार न करता एकदाच चांगल्याप्रकारे दुरुस्ती करण्यांत यावी व असे आवाहन मंडळाचे अधिकारी, ठेकेदार व वास्तुशास्त्रज्ञ यांना करावे व त्याप्रमाणे ते कार्यरत आहेत की नाहीत हे पहाण्यासाठी एक उपसमिती नेमण्यात यावी व ह्या उपसमितीने ठरल्याप्रमाणे कामे होतात की नाहीत हे पहावे.

मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, धोकादायक इमारतींची पहाणी करून ज्या इमारती धोकादायक असतात त्या पडत नाहीत व धोकादायक म्हणून ज्या जाहीर झालेल्या असतात त्यापैकी काही इमारती पडतात. या विषयाबाबत मा. उपाध्यक्ष व मुख्य अभियंता यांच्याशी चर्चा झालेली असून तांत्रिकदृष्टया इमारतीच्या संरचनात्मक टिकाऊपणा किंवा शक्ती अजमावण्याची जी यंत्रे उपलब्ध आहेत ते विकत घेवून त्याद्वारे पहाणी करण्याचे विचाराधीन आहे.

यावर मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, डेहराडूनला लाकडाची ताकद अजमावण्याचे यंत्र मिळते. मुख्य अभियंता श्री. हडदरे यांना अशी यंत्रे भाडयाने घेण्याबाबत किंवा विकत घेण्याबाबत सुचविण्यात आले असता अशी यंत्रे विकत घेण्याची त्यांनी तयारी दर्शविली.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, सर्वेक्षणाचे काम साधारणत: १ फेब्रुवारी पासून सुरु केले जाते व नंतर त्यांना एप्रिल मे पर्यंत नोटीसा देणे चालूच असते. धोकादायक इमारतीतील ज्या लोकांना एप्रिल मे मध्ये खोल्या खाली करण्याची नोटीस मिळते ते खोल्या खाली करण्यास तयार होत नाहीत, कारण तेव्हा शैक्षणिक वर्षांची सुरुवात होवून शैक्षणिक संस्थातील प्रवेशाची प्रक्रिया सुरु होते व लोक आपल्या पाल्याच्या प्रवेशासाठी पैसे खर्च करतात. संक्रमण शिबिराच्या तसेच नवीन ठिकाणी त्यांच्या मुलांना प्रवेश मिळेल की नाही याचीही खात्री नसते, म्हणून एकंदरीत खोल्या खाली करण्यास अडथळे निर्माण होतात. ही समस्या लक्षात घेवून आता असे ठरविण्यांत आले आहे की, पुढील वर्षापासून जुन्या इमारतींच्या सर्वेक्षणाचे काम १ डिसेंबर पासून हाती घेऊन मार्च पर्यंत पूर्ण केले जाईल, जेणेकरुन लोक मार्च मध्ये खोल्या खाली करुन मुलांसाठी दुसरीकडे शाळा कॉलेज मध्ये प्रवेश घेऊ शकतील.

श्री. नाचणकर, सहमुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, पूर्वीच्या मुख्य अधिकारी यांनी असा निर्णय दिला आहे की, वडील ह्यात असताना

८२

मुलाच्या नावावर खोली करताना रु.१०००/- [एक हजार] आकारण्यात यावेत. अशी प्रकरणे येतात की, वडीलांच्या हयातीत एका मुलाच्या नांवे खोली झालेली आहे. परंतु आता तो मुलगा आपल्या भावाच्या नांवे खोली करू इच्छितो. या प्रकरणी सुध्दा रु.१०००/- घेण्यात यावेत असे प्रस्तावित करून पुढील आदेशासाठी मुख्य अधिकारी यांच्याकडे प्रकरण पाठविण्यात येईल व मुलीच्या बाबतीत रु.१०००/- आकारण्यात यावेत.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे मत व्यक्त केले की, पुनर्विकासासाठी नाहरकत प्रमाणपत्र मंडळाकडून रहीवाशी घेतात. तरीही अजून अशा काही इमारतींचे काम सुरू झालेले नाही व इमारती धोकादायक अवस्थेत असून त्या कधीही कोसळण्याची शक्यता आहे. या इमारतींची जबाबदारी जरी विकसकावर असली तरी नाहरकत प्रमाणपत्र देताना मंडळ काही अटी घालत नाही का?

मा. सभापती यांनी यावर माहिती दिली की, प्रचलित कायद्याप्रमाणे कोणतीही अट घालण्यात येत नव्हती हे खरे आहे. परंतु याबाबत आता वटहुकूम निघेल किंवा पावसाळा अधिवेशनमध्ये असा निर्णय घेण्यात येईल की, ना. ह. प्र. पत्राबाबतचे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर विकसितकाराने ठराविक कालावधीत काम पूर्ण केले पाहीजे. अशी अट यापुढे घालण्यात येणार असून मा. मंत्री महोदयांनी सभागृहास तसे आश्वासन दिलेले आहे.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा. सचिव/मुं. इ. दु. व. पु. मंडळ.

सही/-
मुख्य अधिकारी/मुंइदुवपुमं.

सही/-
सभापती/मुं. इ. दु. व. पु. मंडळ.

दिनांक २४.४.९८ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेली दक्षिण परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांची यादी. [परिशिष्ट "अ"]

अ.क्र. [१]	इमारतीचा तपशिल. [२]	दुरुस्तीचा टप्पा / ना.ह.प्र./मंडळ. [३]	मजल्यांची संख्या / रहिवाश्यांची संख्या. [४]	बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर [५]	अंदाजपत्रकाची एकुण रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम. [६]	रु.७५०/- प्रति चौ.मी. मर्यादितील रक्कम. [७]	जादा रक्कम. [८]	शेरा. [९]
	"अ" विभाग :-							
१]	१७ गोळा लेन.	तिसरा / मंडळ	तळ + ३ / ३+४=७	४२५.५० / १७९१.२४	७४४२६१.०० / ६१२५३१.००	१७९८९५.००	४३२६३६.००	मंजूर.
२]	२०-अ मारुती लेन.	दुसरा / मंडळ	तळ + २ / ० + ३ =३	२००.०४ / १५०.८५	१९४२०९.०० / १७४४३५.००	१३०२५५.००	४४१७९.००	मंजूर.
३]	५६-६४ मिंट रोड.	दुसरा / मंडळ	तळ + ४ / ३२+७:३९	१९५१.८५ / ४७०.५१	९२२२३५.०० / ४७२२३५.००	४७२२३५.००	——	मंजूर.
४]	१११-११३-११५ पी.एन.स्ट्रिट.	तिसरा / मंडळ	तळ + ४ / १५ + १० =२५	७१७.२२ / ७६७.२९	५६०३३०.०० / २०६६३०.००	२६४२२३.००	१२४०७.००	मंजूर.
५]	अे.इ.एम.ब्लॉक, सिताराम बिल्डिंग, डॉ. पी. एन. रोड.	चौथा[ब] / मंडळ.	तळ+२+३अंशत: / ३२ +३०= ६२	३५६२.०० / १००५.९०	३५८३०४७.०० / २५१४४४७.००	१६०२९००.००	९११५४७.००	मंजूर.
६]	१८-२२ पहिली पास्ता लेन.	तिसरा / मंडळ	तळ + १ / १३+१५=१८	७३०.०० / ७९७.६८	५८२३११.०० / २९५८११.००	२६०९३०.००	३४८८१.००	मंजूर.
७]	१००-१०२ वुड हाऊस रोड.	दुसरा / मंडळ	तळ + ३ / १२+४=१६	१४१६.१५ / ५४६.२६	७७३५६९.०० / ६८२६५४.००	६८२६५४.००	——	मंजूर.
८]	२२-२८ अपोलो स्ट्रिट.	दु.टप्पा पुन:सुधारित मंडळ.	तळ + ४ / ५+४७=५२	४८०४.०० / ८१६.३०	३९२१५२१.०० / ३६०२३७०.००	३२५३८४९.००	३४८५२१.००	मंजूर.

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
९]	१३३ नेताजी सुभाषचंद्र रोड.	तिसरी मंडळ.	तळ + ५ १५ + २=१७	४२२१.00 ४७४.८२	२००४२४२.०० १६८०७९२.००	१६८०७९२.००	——	मंजूर.
१०]	३ सिनेमा लेन, गोपाळ मॅन्शन.	दुसरा[सु.]	तळघर+तळ+४+ पार्ट-५+पार्ट-६ २२ + ४ =२६	१८८९.१२ ९९७.४७	१८८४३४२.०० १८८४३४२.००	१४१६८४०.००	४६७५०२.००	मंजूर.
११]	१६-१६ ए, मादाम कामा रोड.	तिसरा-सु.	तळ+३+पार्ट-४ +पार्ट-५ २१ + ५=२६	७१७१.०५ ६२८.०५	४५०३७९८.०० ३०७५५०३.००	३०७५५०३.००	——	मंजूर.
	"बी"विभाग :-							
१]	१०७ केशवजी नाईक रोड.	पहिला मंडळ	तळ + ५ ४२ + ६= ४८	२११३.४७ ३०८.९२	६५२९०२.०० ६५२९०२.००	६५२९०२.००	——	मंजूर.
२]	१२८-१४० जे.बी.शहा मार्ग[चिंचबंदर रोड]	दुसरा मंडळ	तळ + २ ११ + ५ = १६	३१०.७० ७७१.२१	२३६६१८.०० २३०११८.००	२२३५७०.००	६५४८.००	मंजूर.
३]	७२-७२-अे मोहम्मद अली रोड[बंदुकवाला बिल्डिंग].	पहिला मंडळ	तळ + ५ १५ + ७ = २२	१०८७.५९ ४९३.२४	५३६४४६.०० ५३६४४६.००	५३६४४६.००	——	मंजूर.
४]	१९९-१९९ अे, नरसीनाथा स्ट्रिट..	तिसरा मंडळ	तळ + ५ १६ + ६ = २२	७५७.४६ १६४९.८४	१२४९६९१.०० १०२८५०६.००	३४६९१०.००	६८१५९६.००	मंजूर.
५]	२८-३० दर्यास्थान स्ट्रीट.	तिसरा मंडळ	तळ + ५ १२+११=२३	७११.३३ ९२३.९८	६५७२६०.०० ३२९७२३.००	२०५९६०.००	१२३७६३.००	मंजूर.
६]	१०३-१०५ झकेरिया मस्जीद स्ट्रिट.	दुसरा मंडळ	तळ + २ ४ + ५ = ९	४५३.८४ ६७३.६१	३०५७१२.०० २५१२५१.००	२५१२५१.००	——	मंजूर.
७]	२४-२६ ओल्ड बंगालीपुरा.	दुसरा मंडळ	तळ + ४ १७ + २ =१९	४२७.७२ ९३६.९४	४००७४८.०० ३७०८१६.००	२९०८५८.००	७१९५८.००	मंजूर.

...३/-

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
८]	१०१ झकेरिया मस्जीद स्ट्रीट..	दुसरा / मंडळ	तळ + ५ / १४ + १ =१५	४५५.८० / ८८२.५०	४०२२४७.०० / ३०७०९९.००	२९६७०२.००	६०३९७.००	मंजूर.
९]	४७-५७ ओल्ड नागपाडा.	दुसरा / मंडळ	तळ + १ / ६ + १०=१६	२७२.७२ / १००१.६०	२७३१५९.०० / ३२९०६१.००	२६०४४२.००	६८६१९.००	मंजूर.
	सी-१-२ विभाग :-							
१]	२४ बापू खोटे स्ट्रिट..	पहिला / मंडळ	तळ + १ / २ + १ = ३	१२३.९५ / ८१३.१६	१००७९१.०० / १००७९१.००	९२९६३.००	७८२८.००	मंजूर.
२]	१२१-१२३ मस्जीद स्ट्रिट.	तिसरा / मंडळ	तळ + ३ / २३+१२=३५	६४०.०० / ८९४.३५	५७२३८२.०० / ३११५७८.००	२११९६.००	९२३८२.००	मंजूर.
३]	४७ मस्जीद स्ट्रिट..	तिसरा / मंडळ.	तळ + ३ / ११ + १ =१२	५०१.०० / ११७६.९८	५८९६६९.०० / ३५७५८२.००	१४३६६५.००	२१३९१७.००	मंजूर.
४]	४३-४५ पहिली पठाण स्ट्रिट..	तिसरा / मंडळ.	तळ + २ / १३ + १ = १४	२७६.८२ / १२५६.१९	३४७७३६.०० / २०७५३७.००	६७४१६.००	१४०१२१.००	मंजूर.
५]	११०-११६ दब्बु स्ट्रिट..	तिसरा / मंडळ	तळ +२+३अंशत: / १२+५= १७	५६३.३७ / ९३५.५७	५२७०७२.०० / ३५१८३६५.००	२४८२९१.००	१०४५४४.००	मंजूर.
६]	५६-७६ मटण स्ट्रिट..	तिसरा / मंडळ.	तळ + २ / ३०+१३=४३	२०८७.५३ / ४४४.१०	९२७०८१.०० / ४८११३५.००	४८११३५.००	——	मंजूर.
७]	३११-३१३-एम.ए.रोड.	तिसरा / मंडळ.	तळ + ३ / ३०+२ = ३२	६५५.३६ / ९०६.६१	५९४१५३.०० / २६६५५३.००	१६३९२०.००	१०२६३३.००	मंजूर.
८]	२००-२१० सैफी ज्युबली स्ट्रिट..	तिसरा / मंडळ.	तळ + ४ / १९+१४=३३	९५१.९५ / ९९२.१०	९४४४३२.०० / ६३८४३२.००	४००९६२.००	२३०४७०.००	मंजूर.
९]	६७-६९ पाकमोडिया स्ट्रिट..	तिसरा / मंडळ	तळ+३+४+अंशत: / १९ + २ = २१	८०४.०७ / १००६.३८	८०९७३४.०० / ४३७२३७.००	२३०९५०.००	२०६२८७.००	मंजूर.

.....४/-

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१०]	४१-४३ मिर्झा स्ट्रिट.	तिसरा मंडळ.	तळ + ५ २ + १२ = १४	६९०.४५ ८६५.४७	६०४०३१.०० २८५२९२.००	११९०९८.००	८६११४.००	----
११]	८-१४-१४-अ-गोगारी मोहल्ला.	चौथा मंडळ.	तळ + ३ २५+४=२९	१०१६.०० ९८६.६३	१००२४२०.०० ४२९४२०.६०	१८९०००.००	२४०४२०.००	मंजूर.
१२]	५८-६२ इब्राहिम रहिमतुल्ला रोड किंवा ३-५-७ मेवावाला स्ट्रिट.	दुसरा[मु] मंडळ	तळ + ४ १६ + ५= २१	५३४.३१ १०६०.५७	५६६६७५.०० ४३४६७५.००	२६८७३२.००	१६५९४३.००	मंजूर.
१३]	६-१२, २री पठाण स्ट्रिट.	दुसरा मंडळ	तळ + ३ १६+६=२२	५११.२४ १५२९.८५	७८२१२१.०० ६९६५१५.००	२९७८२४.००	३९८६९१.००	मंजूर.
	सी-३/४ विभाग :-							
१]	६ धोबीवाडी.	चौथा मंडळ.	तळ + २ ३६+०=३६	५१४.६० ९८५.२३	५०६९९.०० २४६४३७.००	१२५३४८.००	१२१०४९.००	मंजूर.
२]	५५-५७-६१ कांतीलाल शर्मा मार्ग.	पांचवा मंडळ.	तळ+३+भाग ४ २२+१९=४१	१३३९.४० ९८३.२६	१३१६९८७.०० ३१२४३७.००	----	३१२४२८.००	मंजूर.
३]	१०५-१११ के.एम.शर्मा मार्ग.	पांचवा मंडळ	तळ+४+५[अंशत:] १७+१५=३२	१३२२.६९ ९८५.८९	१३०४०३५.०० ३१५५७५.००	३५५७.००	३१२०१८.००	मंजूर.
४]	१४०-बी ॲन्ड सी, कॅव्हल क्रॉस लेन नं.७.	दुसरा मंडळ	तळ + २ ११ + ५ =१६	७४२.५० ७२६.८९	५३९३२९.०० २७९३८७.००	२७९३८७.००	----	मंजूर.
५]	४३ ताडवाडी.	दुसरा मंडळ	तळ + ३ २१+१=२२	३१८.०१ ४६१.००	१७८४०२.०० १३६४०२.००	१३६४०२.००	----	मंजूर.
६]	१२६ कॅव्हल स्ट्रिट.	पहिला मंडळ.	तळ + २ २ + १ = ३	६६५.१० ३०१.२४	२००३५६.०० २००३५६.००	२००३५६.००	----	मंजूर.
७]	१२०-१२४ कॅव्हल स्ट्रिट.	पहिला मंडळ	तळ + ४ ८+५=१३	५८८.९६ ६८२.८५	४०२१७३.०० ४०२१७३.००	४०२१७३.००	----	मंजूर.
८]	५ धोबीवाडी, डॉ.बी.जे.मार्ग.	दुसरा मंडळ	तळ + २ ९ + ३ = १२	२५०.६८ ९४९.१९	२३७९४३.०० २०७९४१.००	१५८००८.००	४९९३३.००	मंजूर.

....५/-

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
९]	२५–२७ जुनी हनुमानवाडी छेद गल्ली.	चौथा मंडळ	तळ + ५ / ८+५९=६७	१२११.२० / ९७३.३०	११७८८५७.०० / ७१८१५२.००	४४७८१२.००	२७०२४०.००	मंजूर.
१०]	४१९–४२१ जे.एस.एस. रोड.	पहिला मंडळ	तळ + १ / ०+८=८	१६५.६६ / ९१३.२२	१४२१५२.०० / १४२१५२.००	११६७४५.००	२५४०७.००	मंजूर.
११]	१२–अे, रोपा लेन, चंदनवाडी.	तिसरा[सु] मंडळ	तळ + ४ / ३० + ३ =३३	८९०.६५ / ९०५.१७	८०६१९०.०० / ६४८७७४.००	५१०५७२.००	१३८२०२.००	मंजूर.
१२]	३७–३९ ट्रिनीटी स्ट्रिट.	तिसरा मंडळ	तळ + ४ / ७+३=१०	२९०.०० / ९८७.३९	२८६३४४.०० / २२१६२२.००	१५२७७९.००	६८८४३.००	मंजूर.
१३]	३–५ नवीवाडी.	पांचवा मंडळ	तळ + ४ / ६६+९=७५	२५३७.०० / ६५४.६६	१६६०८७८.०० / २३७२२२.००	२३७२२२.००	———	मंजूर.
१४]	३४–३६ महादेव शंकर शेठ लेन.	चौथा [सु] मंडळ	तळ + ३ / ४ + ० = ४	३६४.४१ / ९६३.२५	३४८४६५.०० / २०६०४६.००	१३०८८६.००	७५१६०.००	मंजूर.
	डी–१ विभाग :–							
१]	ड.क्र. १–९ जालभाई रोड.	चौथा मंडळ	तळ + ४ / २७+३२=५९	४९४६.०० / ५७२.८७	२८३३४२७.०० / ५५२४२७.००	५५२४२७.००	———	मंजूर.
]	ड.क्र. ३९चौपाटी सी फेस मार्ग.	पहिला मंडळ	तळ + ३ / ३ + ० = ३	४२१.३५ / ७८८.३१	३३२१५८.०० / ३३२१५८.००	३१६०१६.००	१६१४२.००	मंजूर.
]	ड.क्र. ६९–७१ मुगभाट x लेन.	चौथा मंडळ	तळ + ३ / ३१+६=३७	१४८८.८३ / ७६६.७०	११४१४९३.०० / ६३४२४३.००	६०९३७२.००	२४८७१.००	मंजूर.
]	१० मेंडी गल्ली.	दुसरा मंडळ	तळ + ३ / ३ + ० = ३	२४५.३८ / ८९४.७७	२१४४६०.०० / १७३३७८.००	१३७९५४.००	३५४४२४.००	मंजूर.
]	२३३–२६३ अे, वाळकेश्वर रोड.	दुसरा[सु] मंडळ.	तळ + ३ / ६+३=९	९२७.२५ / १२४२.९५	११५२५२४.०० / ७७३७७४.००	३१६६८९.००	४५७०८६.००	मा. सदस्य श्री. उसपकर यांनी पहाणी करण्याच्या अटीस अधिन राहून मंजूर.

......६/–

८३

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
६]	२२-२२ बी, भटवाडी, दुसरी गल्ली.	दुसरा	तळ + ३	४३४.५८	२९६०५४.००	२३१०७४.००	----	मंजूर.
		मंडळ	६+९=१५	६९१.२८	२३१०७४.००			
७]	८३-८३ ए, तात्या घारपुरे पथ.	चौथा	तळ + ४	२३३६.७८	१२३७१३३.००	९८३९२५.००	----	मंजूर.
		मंडळ	५५ + ५ =६०	५२९.४६	८९३९२५.००			
८]	१०-१० अे, भास्कर भाउ लेन.	दुसरा	तळ + २	२११.००	२०३५३१.००	११६२००.००	४५१२१.००	मंजूर.
		मंडळ	१२ + ० = १२	९६४.५५	१६१३२१.००			
९]	८८ बी.सी. बी.जे.मार्ग.	पहिला[ब]	तळ + ३	१४२९.७२	१०४५८३९.००	१०४५८३९.००	----	मंजूर.
		मंडळ.	१६ + ० = १६	७३१.५०	१०४५८३९.००			
१०]	७४-८४ खाडिलकर रोड.	चौथा	तळ+३+भाग-४	२०९८.१९	१०९४०११.००	२९६९१७.००	२७०३६३.००	मंजूर.
		मंडळ	१२ + १२ =२४	९९६.१९	५६७२८०.००			
११]	१०-१८ पाववाला रोड.	दुसरा	तळ +३	११३६.८३	११०४६६५.००	२९४२१५.००	२५२०३५.००	मंजूर.
		मंडळ	२०+५=२५	९७१.७०	५४६२५०.००			
१२]	११ बाणगंगा दुसरी छेद गल्ली.	दुसरा	तळ + २	१७०.८३	२०३२७५.००	४३१२३.००	७५१५३.००	मंजूर.
		मंडळ.	६ + ० =६	११८९.९२	११८२७५.००			
१३]	१७७ एफ, व्ही.पी.रोड.	चौथा	तळ + ३	१२९५.००	११३७६५२.००	४१९२५०.००	१६६४०२.००	मंजूर.
		मंडळ	५१ + १=५२	८७८.५०	५८५६५२.००			
१४]	१७७ सी, डी, व्ही.पी.रोड.	दुसरा [ब]	तळ + १	६३५.८४	६२७६३९.००	३८६९३६.००	१५०७५८.००	मंजूर.
		मंडळ	२७+२ = २९	९८७.१०	५३७६९४.००			
१५]	२७ एच, खोताची वाडी.	तिसरा	तळ + १	२४६.००	२३८४८३.००	५३९८२.००	----	मंजूर.
		मंडळ	७ + १=८	९६९.४४	१२२५०५.००			
१६]	२१५-२१७ जे.एस.एस.रोड.	तिसरा[ब]	तळ + ३	६३३.००	९८९१५५.००	६८२८५५.००	१८००००/-	मंजूर.
		मंडळ	९ + ० =९	१५६२.२०	८६२८५५.००			
१७]	१००-डी, जे.एस.एस.रोड.	पांचवा	तळ + २	१४८४.००	१४७२५३२.००	१३१००३.००	३५९५२९.००	मंजूर.
		मंडळ	२३+२५=२८	९९२.२७	४९०४३२.००			
१८]	४४-४६ राजाराम मोहन रॉय रोड.	दुसरा	तळ + ४	१३०४.००	१२९६८१९.००	७८२५११.००	२६३६३३.००	मंजूर.
		मंडळ	१२ + ५ = १७	९९४.४९	१०४६१४४.००			

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१९]	३५-डी/५, मुगभाट क्रॉस लेन.	दुसरा मंडळ	तळ + ३ ९ + ० = ९	३४३.३५ २११८.८५	५५४६६३.०० ५२४३९२.००	१५८९१८.००	९६५४७४.००	मंजूर.
२०]	१०३-१०३-अ, १०७-१०७ अ, तात्या घारपुरे पथ.	तिसरा[सु] मंडळ.	तळ + २ ११+४=१५	७६७.५० १२३६.२८	७१८५९५.०० ३८७५६६.००	२४७५९६.००	१४२९७०.००	मंजूर.
२१]	२०६ जे.एस.एस. रोड.	चौथा मंडळ.	तळ + ३ ८ + ६ = १४	१३२०.९० ९५४.८६	११६१३८०.०० ६०९५४०.००	३२९५४०.००	२७००००.००	मंजूर.
२२]	३२ हरिश्चंद्र गोरेगांवकर रोड.	पहिला मंडळ	तळ + ४ १६ + ७ = २३	१३५८.१५ ६३५.२६	८६२७८२.०० ८६२७८२.००	८६२७८२.००	----	मंजूर.
२३]	१७७ एफ, व्ही.पी. रोड.	चौथा मंडळ	तळ + ३ ५१ +१=५२	१३९५.०० ८७८.८०	११३७६५३.०० ५८५६५२.००	----	----	मंजूर.
	डी-२ विभाग :-							
१]	१४५[अ]१५३[१४९ ए]फॉकलँड रोड.	दुसरा मंडळ	तळ + २ ९+१३=२२	१४८५.४३ २२७५८.२७	११२६३६७.०० ८११३६७.००	७९९०७२.००	११२९५.००	मंजूर.
२]	१७ वाडीया स्ट्रिट[मिस्त्री बिल्डिंग]	चौथा मंडळ	तळ + ४ १०+४=१४	११११.६५ ९६०.६३	१०६७८८४.०० ५९२३१५.००	३५८१६८.००	२३४१४७.००	मंजूर.
३]	२६६-२७४ फॉकलँड रोड, प्लंबर रोड.	चौथा. मंडळ	तळ + ३ २०+१ = २१	५०६.४६ १७५९.०४	८९०८८२.०० ६४९६८२.००	१३८६४५.००	५११०३७.००	मंजूर.
४]	३४ खेतवाडी, ७वीगल्ली[इराणीचाळ]	तिसरा[सु] मंडळ	तळ + ३ ६+५=११	५५२.७७ १५७९.८८	८७३३१३.०० ७७६४२८.००	३१७६९३.००	४५८७३५.००	मंजूर.
५]	१५४-१५८-अ, अलीभाई प्रेमजी मार्ग.	तिसरा मंडळ	तळ + २ १६+१२=२८	१०२८.०० ९२९.५२	९५५५४४.०० ७०७५४४.००	५२३०००.००	१८४५४४.००	मंजूर.
६]	३ महिला पटेल अग्यारी लेन.	दुसरा मंडळ.	तळ +३+भाग-४ ६ +४=१०	९१४.४५ ७०२.३४	६९८४४३.०० ५७९१४३.००	५७९१४३.००	—	मंजूर.
७]	११० अर्देशिर दादी मार्ग[गणेश भुवन],	दुसरा[सु.]	तळ+३+भाग	४८२.८०	४६८८४७.००	—	—	

दि. २४.४.९८ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ५२ बैठकीत उत्तर परिमंडळाची मंजूर करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांची यादी.

परिशिष्ट "ब

अ.क्र.	विभाग.	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा / मंडळ/नाहप्र.	मजले / भाडेकरु नि+अनि. = एकूण.	क्षेत्रफळ चौ.मी. / दर चौ.मी. चा खर्च.	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम.	रु. ७५०/- प्रति चौ.मी. मंजुरीकरिता प्रस्तावित रक्कम.	रु. ७५०/- प्रति चौ.मी. वरील जास्त असलेली रक्कम.	शेरा
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१]	ई-१	अ	इ.क्र.३९-सी, रंगारी चाळ, डॉ. बी. ए. रोड.	तिसरा / मंडळ.	तळ + २ / ६०+०=६०	१०६३.७६ / ७३८.८१	७८४६२५.०० / ३९२४११.००	३९२४११.००	--	मंजुर
२]	-"-	अ	इ.क्र.२७२ ए, रे रोड, माझगांव.	चौथा / मंडळ.	तळ+२+३ अंशत: / ८१+४=८५	१७०५.३४ / ८८७.८९	१५१४१५५.०० / ७०२३९८.००	४६७२४८.००	२३५१५०.००	मंजुर.
३]	-"-	अ	इ.क्र.५-९ जेलकर स्ट्रिट, [४० हॉरचील लेन/२२ हॉस्पीटल लेन].	तिसरा / मंडळ.	तळ + ३ / ४५+०=४५	९९४.७७ / ९७६.३३	९७१२३३.०० / ५३०५३१.००	३०५३७५.५०	२२५१५५.००	मंजुर.
४]	-"-	अ.	इ.क्र. ४४०-४४४, सर जे.जे. रोड.	चौथा / मंडळ.	तळ+४+अंशत: / ३+२=५	४०४.६० / ६८३.०६	२७६३६६.०० / ११८९२१.००	११८९२१.००		मंजुर.

-: २ :-

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	१
१]	ई-२	अ	इ.क्र. ४-अे, कामाठीपुरा, ४थी गल्ली.	पहिला / मंडळ.	तळ +- २ / २+-१= ३	८१.६१ / ७३१.१६	५८८५४.०० / ५८८५४.००	५८८५४.००	---	मंजूर
२]	-"-	अ	इ.क्र. ६२८-६३० ना.म.जोशी मार्ग.	तिसरा / मंडळ.	तळ +- ३ / २२+-५=२७	१२७३.५५ / ८१६.५५	१८३९९२७.०० / ४२२६७५.००	३३७९१०.५०	८४७६४.००	मंजूर
३]	-"-	अ	इ.क्र. १६२ मौलाना आझाद रोड.	दुसरा / मंडळ.	तळ+-१+-२अंशत: / ३६+-७=४३	१५४६.६८ / ६१४.६५	९५०६७६.०० / ८१३५९६.००	८१३५९६.००	---	मंजूर
४]	-"-	अ	इ.क्र. ६५-७३ केशवराव खाडये मार्ग.	तिसरा / मंडळ.	तळ +- २ / २३+-१७=४०	११५७.०० / १०८५.२३	१२५५६१९.०० / ७१२२३१.००	३२५०६२.००	३८७८६९.००	मंजूर
५]	-"-	अ	इ.क्र. ३० कामाठीपूरा, १०वी गल्ली.	दुसरा / मंडळ.	तळ +- २ / १६+-२=१८	३०५.१३ / १०४१.१२	३२०१४१.०० / २०९५५७.००	११८२६३.५०	९१२९३.५०	मंजूर
६]	-"-	अ	इ.क्र. २२१, मौलाना आझाद रोड.	दुसरा / मंडळ.	तळ +- २ / ८+-५=१३	४६४.३७ / ७६९.७७	३५७४६१.०० / २७००६७.००	२६०८८३.००	९१८३.५०	मंजूर
७]	-"-	अ	२४६ मौलाना आझाद रोड.	दुसरा / मंडळ.	तळ +- १ / ४+-३=७	३३०.०० / ९९८.५९	३२९५३५.०० / २३९१०३.००	१५७०६८.००	८२०३५.००	मंजूर
८]	-"-	अ	५५-५७ मस्तान टँक रोड.	चौथा / मंडळ.	तळ +- ३ / ५२+-२= ५४	९५७.३० / ९९०.५६	९४८२५४.०० / ५१८६८५.००	२८८४०६.००	२३०२७९.००	मंजूर
९]	-"-	अ	१३ मांखळी स्ट्रिट, ३री फ्रांस लेन.	तिसरा / मंडळ.	तळ +- ३ / ४५+-३=४८	१२२७.०० / ११४८.१४	१४०८७७५.०० / ६६६४३४.००	१७७९०९.००	४८८५२५.००	मंजूर
१०]	-"-	अ	३६-३८ कामाठीपूरा, ३री गल्ली.	तिसरा / मंडळ.	तळ+-२ पो.मा. / २६+-३=२९	४६६.६२ / ९२१.७०	४३००८५.०० / २३८९९६.००	१५८८७६.००	८०१२०.००	मंजूर
११]	-"-	अ	८५ हुजूरिया स्ट्रिट.	दुसरा / मंडळ.	तळ +- ३ / ७ + २ = ९	२३३.४० / १२०८.२०	२८१८९८.०० / २४०४८४/[illegible]	१३३५७६.००	१०६९०८.००	मंजूर
१२]	-"-	अ	१३ बदलू रंगारी स्ट्रिट.	तिसरा / [illegible]	तळ +- १ / ३७+-२=३९	६१२.२५ / [illegible]	५४८४७२.०० / [illegible]	१६८०१७.००	८९२८४.००	मंजूर

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१३]	ई–२.	अ	१७ उंद्रिया स्ट्रिट.	दुसरा / मंडळ.	तळ + ३ / ३ + १=४	१८६.१४ / १३१८.२८	२३९४५३.०० / २०७८६४.००	१०४६४१.००	१०३२२३.००	मंजूर.
१]	फग[द]	अ क.	इ.क्र. १९ सी क्राफ्ट बिल्डिंग, काशिनाथ धुरु मार्ग.	पहिला / मंडळ.	तळ + १ / २ + ०=२	२७६.८१ / ६४७.११	१७९१२८.०० / १७९१२८.००	१७९१२८.००	——	मंजूर.
२]	–"–	ब	इ.क्र. २०० बॉम्बे गॅरेज, डॉ. आंबेडकर रोड.	पहिला / मंडळ	तळ + ३ / ६ + १ =७	६०२.०० / ७०४.६५	४२४२०३.०० / ४२४२०३.००	४२४२०३.००	——	मंजूर.
३]	–"–	अ	इ.क्र. १३५ नबाब चेंबर्स, गोविंदजी केणी रोड.	दुसरा / मंडळ	तळ + ३ / ३२ + ७=३९	८४२.५६ / ७१८.४६	६०५३४७.०० / ४७३५६७.००	४७३५६७.००	——	मंजूर.
४]	–"–	अ	इ.क्र. १८२ हाजी हबीब बिल्डिंग, डॉ. आंबेडकर रोड.	चौथा / मंडळ.	तळ + ३ / ५७ + ४१=९८	४११९.९१ / ५८९.०४	२४२६८२२.०० / ८४१६९८.००	८४१६९८.००	——	मंजूर.
५]	–"–	अ	इ.क्र. १८५, पटेल टेरेस, जेरबाई वाडिया रोड.	दुसरा / मंडळ	तळ + ३ / ५५ + १४=६९	२५३६.४७ / ६३१.९५	१६०२९३२.०० / १२७८९५९.००	१२७८९५९.००	——	मंजूर.
६]	–"–	अ	इ.क्र. ७६, श्रॉफ बिल्डिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड.	दुसरा / मंडळ.	तळ + २ / ७२ + २५=९७	२३३३.४० / ७०४.४३	१६४३७४०.०० / १५१५१९३.००	१५१५१९३.००	——	मंजूर.
७]	–"–	ब	शेटये बिल्डिंग, जगन्नाथ भातणकर मार्ग.	तिसरा / मंडळ.	तळ + ४ / ५५ + ५=६०	१९६३.०० / ५४५.२१	१०७०२६६.०० / ४१७४९९.००	४१७४९९.००	——	मंजूर.
८]	–"–	अ	इ.क्र. ३०–३४–३८ निर्मला निवास, डॉ. आंबेडकर रोड.	दुसरा / मंडळ.	तळ + २ / ११ + ८ = १९	५६१.०० / ८२०.००	४६०१९०.०० / ३६०३८६.००	३२०९४६.००	३९४४०.००	मंजूर.
९]	–"–	अ	इ.क्र. १३, झवेरी बिल्डिंग, परमार गुरुजी मार्ग.	दुसरा / मंडळ.	तळ + ३ / २१ + २=२३	८९४.६६ / ८९३.८८	७९९७३२.०० / ५०४४९९.००	३७५२७७.००	१२९२२२.००	मंजूर.
१०]	–"–	अ	इ.क्र. ९–९बी, ९–सी, ११–११–बी, १३–१३ बी, १५–१५–अ, डॉ. ई. मोजेस रोड.	दुसरा / मंडळ.	तळ + ३ अंशत: / ११ + ११=२२	१०९९.१३ / ६२४.५५	७६३४११.०० / ४९२३०९.००	४९२३०९.००	——	मंजूर.

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
११]	कग[द]	अ	इ.क्र. ३८–ई, झवेरी हाऊस, परळगांव.	तिसरा मंडळ.	तळ + १ २०+०=२०	४१६६.७१ ७८८.७४	३२८६७७.०० १८६२८३.००	१७०१३८.००	१६१४४.००	मंजूर.
१२]	–"–	अ	इ.क्र. ६६–बी, शापुरजी चाळ, परळ व्हिलेज.	तिसरा मंडळ.	तळ + २ ६६+०=६६	११२८४.०० ८०५.४१	१०२४१५३.०० ३५७६९०.००	२८६५३७.००	७११५३.००	मंजूर.
१३]	–"–	अ	इ.क्र. ३८–बी, एलफिस्टन रोड.	दुसरा मंडळ.	तळ + १ १६+०=१६	४४३.०० ९८९.८५	४३८५०४.०० ३६७०४१.००	२६०७८७.००	१०६२५४.००	मंजूर.
१४]	–"–	अ	इ.क्र. ६३–६९ सिताराम जाधव मार्ग.	दुसरा मंडळ.	तळ + ३ १२+२६=३८	१००५.०० ७०१.९६	७०५४७७.०० ५४१६४३.००	५४१६४३.००	—	मंजूर.
१५]	–"–	अ	इ.क्र. ५०–५२ कासम मीठा चाळ, दादासाहेब फाळके रोड.	चौथा मंडळ.	तळ + २ १३ =१८	८३९.०१ १९१३.०२	८४९९३६.०० ४३४१४१.००	२१३४६२.५०	२२०६७८.००	मंजूर.
१६]	–"–	अ	इ.क्र. १६७–अे, रेडीमनी टेरेस, डॉ. ॲनी बेझंट रोड.	चौथा मंडळ.	तळ + ४ ४९+१०=५९	३७९४.५८ ५५९.५७	२१२३३६६.०० ५९०५६३.००	५१०५६३.००	—	मंजूर.
१७]	–"–	अ	अमिना मॅन्शन, माधवदास पास्ता रोड.	तिसरा मंडळ	तळ + ४ ५८+४=६२	२०९३.६४ ९४५.७०	१७७९९६६.०० ९८१८२२.००	५७२०८६.००	४०१७३६.००	मंजूर.
१८]	–"–	ब	इ.क्र. १२०–अे–१२४–अे, महिमा मॅन्शन डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड.	पु. टप्पा[ग] मंडळ.	तळ + ३ ७२+२१=९३	२७३७.०६ ६५४.०२	१७९०११३.०० १७९०११३.००	—	—	मंजूर.
१९]	–"–	ब	इ.क्र. १३–१३–अे, लक्ष्मी नारायण लेन, माटुंगा.	दु. टप्पा[ग] मंडळ.	तळ + ४ ३२+८=४०	२३०३.९२ ७०९.६८	१६३७०६२.०० १३८१६१०.००	—	—	मंजूर.

.....५/-

	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
२]	फर्ग[उ]	अ	इ.क्र.३५० छपरा बिल्डिंग, एन.सी. केळकर मार्ग, दादर [प].	सहावा / मंडळ	तळ + ३ / ८०+१३=९३	२४२०.०० / ११२२.५९	२७१६६८१.०० / १०६४०६३.००	१५९३८२.००	९०१६८१.००	मा. सदस्य श्री. दिलीप गोडांबे यांनी पहाणी करण्याच्या अटीस अधिन राहून मंजूर.
३]	-"-	अ	इ.क्र.३५२ खांडके क्र.४, एन.सी. केळकर रोड.	तिसरा / मंडळ.	तळ + ३ / २७+१२=३९	२०४१.८५ / ९७२.५५	१९९३५८५.०० / १११२९८९.००	६५६७९१.५०	४५६१९७.००	मंजूर.
४]	-"-	अ व क	इ.क्र.२१५, लांबा बिल्डिंग, सर भालचंद्र रोड, माटुंगा.	पहिला / मंडळ.	तळ + २ + ३अंशत: / २१+२=२३	१३०१.२३ / ३५५.९८	४६३२१४.०० / ४६३२१४.००	४६३२१४.००	---	मंजूर.
५]	-"-	अ	इ.क्र.७ व ८ खांडके बिल्डिंग, रानडे रोड, दादर [प].	चौथा / मंडळ.	तळ + २ / ४८+३६=८४	२३५१.२५ / ९८७.९९	२३२३०२१.०० / १०१७३८०.००	४५७७९६.५०	५५९५८३.५०	मंजूर.
६]	-"-	अ	इ.क्र.५५७ श्रीराम मॅन्शन क्र.१, होरमसजी एडनवाला रोड, माटुंगा.	दुसरा / मंडळ.	तळ + २ / १२ + ० = १२	८५८.६५ / ९६३.२१	८२७०६३.०० / ४९२७८४.००	३०९७०८.५०	१८३०७५.५०	मंजूर.
७]	-"-	अ	इ.क्र.९-अे, सर्वोदय बिल्डिंग, गोखले रोड [द], दादर [प].	पहिला / मंडळ.	तळ + २ / २३+७=३०	११९८.६८ / ३२९.२३	३९४६४७.०० / ३९४६४७.००	३९४६४७.००	---	मंजूर.

१०९